१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, बुधवार २७ मे, २०२६ • वर्ष-१०४, अंक- ८३, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 83 Marathi - Daily - Mumbai, 27 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे    24x7 : www.navakal.in    Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

"NEET परीक्षेचा तणाव आणि विद्यार्थ्यांचा जीव!"

navakal.in

@navakal.news  Navakal Digital Network  @_NDN_Offical  @NavakalNews

# कांद्याला किलोला सव्वा रुपया! शेतकरी रडवेला

## फडणवीस म्हणतात फोटोसाठी नेते आंदोलनात

**कांद्याला किलोला सव्वा रुपया हा कवडीमोल भाव मिळत असल्याने हवालदील झालेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी आज विरोधी पक्षाच्या नेत्यांच्या नेतृत्वात नाशिक, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर येथे जोरदार आंदोलन केले. याच दरम्यान केंद्र सरकारने कांदा खरेदीचा भाव वाढवला, पण ही वाढही तुटपुंजी असल्याचा आरोप करीत शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू राहिले. यामुळे संतप्त होऊन मुख्यमंत्री फडणवीस यांनी टीका करीत म्हटले की, ही राजकीय आंदोलने आहेत. कांदा कापूनही ज्यांच्या डोळ्यात पाणी येत नाही ते आता अश्रू गाळत आहेत. मात्र अखेर या आंदोलनाचा परिणाम झाला आणि कांदा प्रश्नावर चर्चा करण्यासाठी मी उद्या दिल्लीला जातो आहे, असे फडणवीस यांनी जाहीर केले.**

■ मुंबई

**नाशिकच्या** चांदवडमध्ये कांदा शेतकऱ्यांनी शेकडोंच्या संख्येने रस्त्यावर उतरून राज्य आणि केंद्र सरकारच्या नावाने आक्रोश केला. मुंबई-आग्रा महामार्गावर ठिय्या देत रस्त्यावर कांदे ओतून शेतकऱ्यांनी सरकारचा निषेध केला. संतप्त शेतकऱ्यांनी सुमारे दोन तास महामार्ग रोखून धरला. त्यामुळे येथे मोठी वाहतूक कोंडी झाली. आंदोलन तीव्र होत असल्याचे पाहून पोलिसांनी प्रमुख नेत्यांना ताब्यात घेतले. त्यानंतरही शेतकरी महामार्गावर ठिय्या देऊन बसले.

कांद्याला हमीभाव मिळावा आणि पेट्रोल-डिझेलची दरवाढ मागे घ्यावी यासह शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आज महाविकास आघाडीने राज्यव्यापी आंदोलन केले. नाशिकसह पुणे, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर आणि सोलापू आदि शहरांमध्ये महाविकास आघाडीतील घटकपक्षाच्या नेत्यांनी शेतकऱ्यांच्या आंदोलनात सहभाग घेतला.

चांदवडमध्ये झालेल्या आंदोलनात राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते आमदार रोहित पवार, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, शिवसेना उबाठाचे नेते आमदार अंबादास दानवे, शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे आणि मविआतील अन्य घटक पक्षांचे नेते आंदोलनात सहभागी झाले होते.

याप्रसंगी रोहित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. निवडणुकीपूर्वी फडणवीस यांनी शेतकऱ्यांना २४ रुपये किलो हा भाव देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र आता निवडणुका झाल्या, स्वतःचा राजकीय स्वार्थ साधल्यानंतर तेच फडणवीस कांद्याला १२ रुपये भाव देण्याची भाषा करत आहेत. शेतकऱ्यांची अशी फसवणूक करू नका, आश्वासनाची पूर्तता करा. नेते, व्यापारी कसेही जगतील, पण शेतकऱ्यांना मदत केली नाही

पान ७ वर



### सपकाळांची जीभ घसरली

नाशिकच्या चांदवडमधील आंदोलनादरम्यान काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत बोलताना जीभ घसरली. आंदोलकांसमोर भाषण करताना त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची एकेरी भाषेत आणि अर्वाच्य भाषेत टीका केली.

देशाच्या पंतप्रधानांविषयी अशा प्रकारची भाषा वापरल्यामुळे सपकाळ यांच्यावर टीका होत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, विरोधक पंतप्रधान मोदींवर आरोप करत आहेत, पण मोदीजी खरे धुरंधर आहेत. त्यांच्यावर टीका करणारे दलिंदर आहेत.

# युद्धविराम! करार! काहीच नाही अमेरिकेचा पुन्हा इराणवर हल्ला



**अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्ध कधी संपुष्टात येते याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. सध्या या दोन देशांदरम्यान तात्पुरती युद्धबंदी लागू आहे. कायमस्वरुपी युद्धबंदीसाठी उभयपक्षी वाटाघाटी सुरू आहेत. काल रविवारी युद्धबंदी जाहीर होईल असे वाटत असतानाच अमेरिकेने पुन्हा एकदा इराणवर हल्ले सुरू केले. अमेरिकेने इराणचे क्षेपणास्त्र तळ आणि समुद्रात सुरुंग पेरणाऱ्या इराणच्या बोटींना या हल्ल्यांमध्ये लक्ष्य केले. त्यामुळे पुन्हा एकदा जगाची चिंता वाढली आहे. इंधन टंचाईने बहुतांश देश ग्रस्त आहेत.**

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेच्या** सेंट्रल कमांडने (सेंटकॉम) मात्र म्हटले की, इराणवरील हल्ला ही अमेरिकेने स्वसंरक्षणासाठी केलेली कारवाई होती. सेंटकॉमचे प्रवक्ते टिमोथी हॉकिन्स म्हणाले की, अमेरिकन सैनिक आणि युद्धनौकांना वाचवण्यासाठी ही कारवाई करणे आवश्यक होते. कारण इराणच्या बोटी होर्मुजच्या सामुद्रधुनीत सुरुंग पेरण्याचा प्रयत्न करत होत्या. ज्यामुळे आंतरराष्ट्रीय जहाजे आणि अमेरिकेच्या युद्धनौकांना धोका निर्माण होऊ शकला असता.

अमेरिकेच्या हल्ल्याला इराणच्या रिव्हॉल्युशनरी गार्डकडून तातडीने प्रत्युत्तर दिले नाही.

पान ७ वर

# पेट्रोल-डिझेलनंतर आता सीएनजीही २ रुपयांनी महाग



■ मुंबई

**पेट्रोल** आणि डिझेलनंतर आता सीएनजीच्या दरातही वाढ झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना आणखी एक महागाईचा झटका बसला आहे. आज सीएनजीच्या दरात प्रति किलो २ रुपयांची वाढ करण्यात आली असून, गेल्या ११ दिवसांतील ही चौथी दरवाढ ठरली आहे.

नागपूरमध्ये सीएनजीच्या दरात २ रुपयांची वाढ करण्यात आली असून, बायो सीएनजीचा दर आता ९५ रुपये प्रति किलोवर पोहोचला आहे. तर एससीजी कंपनीच्या सीएनजीचे दर टप्प्याटप्प्याने वाढून सुमारे ९२ रुपये प्रति किलोपर्यंत गेले आहेत. नागपूर शहरात मोठ्या प्रमाणात टॅक्सी आणि ऑटो सीएनजीवर चालत असल्याने या दरवाढीचा थेट परिणाम प्रवाशांवर होणार आहे. टॅक्सी आणि रिक्षा भाडेवाढीची शक्यता देखील व्यक्त केली जात आहे. छत्रपती संभाजीनगरमध्येही सीएनजीच्या दरात सुमारे १ रुपया १७ पैशांची वाढ झाली आहे. यामुळे येथील नागरिकांनाही महागाईचा फटका बसणार आहे. स्थानिक प्रवास खर्च वाढण्याची शक्यता आहे. मुंबईतही सीएनजीच्या दरात सुमारे २ रुपयांची वाढ झाली आहे. सध्या दर प्रति किलो ८४ रुपयांवर पोहोचला आहे. पुण्यात सीएनजीचा दर ९२.५० रुपये प्रति किलोपर्यंत गेला आहे.

या वाढीनंतर दिल्लीमध्ये सीएनजीचा दर ८३.०९ रुपये प्रति किलो झाला आहे. याआधी १५ मे रोजी २ रुपये, १८ मे रोजी १ रुपया आणि २३ मे रोजी १ रुपयांची वाढ करण्यात आली होती.

# शाळा आठवड्यातून फक्त ३ दिवस भरवा! स्कूल बस संघटनेची मागणी

■ मुंबई

**राज्यातील** वाढत्या पेट्रोल आणि डिझेल दरांमुळे स्कूल बस मालकांवर आर्थिक संकट ओढावले आहे. शाळा आठवड्यातून फक्त तीन दिवस भरवून उर्वरित दोन दिवस ऑनलाईन वर्ग सुरू ठेवावेत, अशी मागणी स्कूल बस संघटनांकडून करण्यात आली आहे.

पुढील महिन्यापासून राज्यभरातील शाळा सुरू होणार आहेत. वाढलेल्या इंधनदरामुळे सध्याच्या शुल्कात स्कूल बस सेवा चालवणे परवडत नसल्याचे बस मालकांचे म्हणणे आहे. त्यामुळे शाळा एकाच सत्रात सुरू ठेवून बसच्या फेऱ्या कमी कराव्यात, अशी मागणी संघटनांनी केली आहे. शाळा सुरू होण्यापूर्वी म्हणजेच १ जूनपर्यंत राज्य सरकारने याबाबत आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी विनंती स्कूल अँड कंपनी बस ओनर्स असोसिएशनने केली आहे. तसेच सरकारने स्कूल बस क्षेत्राला तातडीने अनुदान किंवा इंधन सवलत द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

# मी खूप अभ्यास केला, आता पुढे काय नीटच्या तणावाने मैथिलीची आत्महत्या

■ लातूर

राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (नीट-यूजी) रद्द झाल्यानंतर निर्माण झालेल्या मानसिक तणावातून लातूर तालुक्यातील गोंदेगाव येथे १८ वर्षीय मैथिली अशोक सोनावणे या विद्यार्थिनीने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. मैथिलीचे डॉक्टर होण्याचे स्वप्न अपूर्णच राहिले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मैथिलीचे वडील अशोक विठ्ठल सोनावणे यांनी गटेगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या जबाबात मुलीच्या मानसिक तणावाबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले की, मैथिली अत्यंत हुशार आणि महत्त्वाकांक्षी मुलगी होती. यंदा बारावीच्या परीक्षेत तिने ५१.५० टक्के गुण मिळवले होते. डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ती दिवस-रात्र नीट परीक्षेची तयारी करत होती. तिने सीईटी परीक्षाही दिली होती. नीट परीक्षेतील कथित पेपरफुटी आणि परीक्षा रद्द झाल्याच्या बातम्यांनंतर मैथिली मोठ्या मानसिक तणावाखाली गेली होती. बाबा, मी खूप अभ्यास केला, चांगले गुणही मिळवले; पण आता पुढे काय होईल? असा प्रश्न ती वारंवार विचारत होती. भविष्याबाबतची चिंता तिच्या मनात सतत सुरू होती.

१६ मे रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास मैथिली घरात दिसून न आल्याने कुटुंबियांनी तिचा शोध सुरू केला. त्यावेळी ती त्यांच्या शेतातील कडुलिंबाच्या झाडाला स्कार्फच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळली. कुटुंबियांनी तातडीने तिला खाली उतरवून मुरूड येथील सरकारी रुग्णालयात दाखल केले.

# भोंदू खरातला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी! नाशिक रोड कारागृहात रवानगी

■ मुंबई

**कथित** मनी लॉन्ड्रिंग आणि आर्थिक गैरव्यवहार प्रकरणातील आरोपी भोंदूबाबा अशोक खरात याला मुंबई सत्र न्यायालयातील विशेष पीएमएलए न्यायालयाने आज १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. त्याची ईडी कोठडी संपल्यानंतर आज त्याला न्यायालयात हजर करण्यात आले होते. त्याची रवानगी आता नाशिक रोड कारागृहात करण्यात येणार आहे.



गेल्या सहा दिवसांपासून खरात ईडीच्या कोठडीत होता. आज झालेल्या सुनावणीदरम्यान ईडीच्या वकिलांनी न्यायालयाला सांगितले की, खरातच्या अधिक चौकशीची आवश्यकता नाही. त्यानंतर न्यायालयाने त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. ईडीने खरातच्या संशयास्पद आर्थिक आणि बेनामी व्यवहारांबाबत चौकशी केली. या तपासादरम्यान काही महत्त्वाची कागदपत्रे तपास यंत्रणेच्या हाती लागल्याची माहिती आहे.

# राज्यात उन्हाचा कहर! २४ तासांत उष्माघाताने १३ जणांचा मृत्यू



■ जळगाव

**राज्यात** गेल्या काही दिवसांपासून तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढत आहे. त्यातच गेल्या २४ तासांत उष्माघात व तीव्र उष्णतेमुळे किमान १३ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. विशेषतः विदर्भ आणि खान्देशात उन्हाचा तडाखा तीव्र झाला असून, प्रशासनाची चिंता वाढली आहे.

अमरावती जिल्ह्यात सर्वाधिक फटका बसला आहे. गेल्या २४ तासांत ७ जणांचा मृत्यू झाला आहे. यापैकी २ जणांचा मृत्यू अधिकृतरित्या उष्माघाताने झाल्याची नोंद आहे, तर उर्वरित मृत्यू हे तीव्र उष्णतेमुळे झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या मृतांमध्ये बेघर आणि बेवारस नागरिकांचे प्रमाण जास्त असल्याचे आढळले आहे. दरम्यान, भारतीय हवामान विभागाने अमरावती, अकोला आणि परिसरासाठी 'रेड अलर्ट' जारी केला आहे. विदर्भात 'नवतपा' सुरू झाल्याने पुढील काही दिवस तापमान आणखी वाढण्याची शक्यता आहे.

जळगाव जिल्ह्यातही उष्णतेचा कहर कायम असून, ४ जणांचा मृत्यू झाला आहे. जळगावच्या चिंचोली येथील सेंट्रिंग कामगार केशरलाल दौलत पाटील (५७) यांचा उष्माघाताने मृत्यू झाला. तसेच प्रवीण मिस्तरी, श्रीकांत कोळी आणि नंदू पाटील या तिघांचा उलटी, चक्कर यांसह इतर उष्माघात सदृश्य लक्षणांनी मृत्यू झाला आहे. चंद्रपूर जिल्ह्यात तापमान ४७ अंशांच्या पुढे गेले आहे. भद्रावती तालुक्यात दोन जणांचा उष्माघाताने मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. मुरसा येथे एका अज्ञात वृद्धाचा मृतदेह सापडला, तर आंबेडकर चौकात राहणाऱ्या ६० वर्षीय निराधार महिलेचाही मृत्यू झाला आहे.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नागरिकांना दुपारी १२ ते ४ दरम्यान घराबाहेर न पडण्याचे आवाहन केले आहे.

# मी आणि पटेल यांनीच टीकेचे धनी का व्हायचे? तटकरेंचा पक्ष बैठकीत सवाल

■ मुंबई

**मुंबईतील** देवगिरी निवासस्थानी उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत पक्षाची बैठक पार पडली. या बैठकीला जवळपास पक्षाचे सर्व आमदार आणि ज्येष्ठ नेते उपस्थित होते. या बैठकीत प्रदेशाध्यक्ष आणि खा. सुनील तटकरे यांनी नाराजीचा सूर लावत मी आणि पटेल यांनीच टीकेचे धनी का व्हायचे? असा सवाल उपस्थित केला. यावेळी मंत्री भुजबळ आणि तटकरे यांच्यात वाद झाल्याची चर्चा आहे. मात्र भुजबळ यांनी हा दावा फेटाळला. तर ज्येष्ठ नेते आणि खा. प्रफुल्ल पटेल मुंबईत असूनही बैठकीला गैरहजर राहिल्याने पक्षातील अंतर्गत वादाच्या चर्चांना आज पुन्हा एकदा खतपाणी मिळाले.

सुनील तटकरे म्हणाले की, अजित पवार यांच्या निधनानंतर पक्ष एकसंध ठेवण्यासाठी प्रफुल्ल पटेल आणि मी मोठी भूमिका बजावली. त्यानंतर आमच्यावर सतत टीका झाली. मात्र आमच्या समर्थनार्थ पक्षाचा एकही नेता उभा राहिला नाही. विलीनीकरणाच्या चर्चांदरम्यानही आम्ही टीकेला सामोरे गेलो. त्यावेळीही आमची बाजू कोणी मांडली नाही. प्रत्येक वेळी फक्त तटकरे आणि पटेल यांनीच टीकेचे धनी का व्हायचे? वरिष्ठ नेतृत्व यावर भूमिका घेणार आहे की नाही? दरम्यान, तटकरे बोलण्यापूर्वीच पार्थ पवार यांनी बैठकीतून काढता पाय घेतल्याची माहिती

पान ७ वर

**जून २०२३ नंतर सुरू झालेल्या रक्तरंजित संघर्षामध्ये सुमारे वर्षभर धगधगत राहिलेले मणिपूर पुन्हा एकदा अशांततेच्या दिशेने वाटचाल करत आहे. संशयित कुकी बंडखोरांनी नागा समाजातील ६ जणांचे अपहरण करून त्यांना ओलीस धरल्याने नागा समाजात संतापाची लाट उसळली आहे. या ६ जणांच्या सुटकेसाठी काल शेकडोंच्या संख्येने नागा कार्यकर्त्यांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले.**

# मणिपूरमध्ये पुन्हा अशांतता नागा कार्यकर्त्यांचे आंदोलन

■ इंफाळ

**नागा** पीपल्स युनियने (इंफाळ) आयोजित केलेल्या मोर्चा इस्ट इंफाळ जिल्ह्यातील बाजारपेठ परिसरातून सुरू झाला. पुढे काही मैतेई समाजाचे लोकही या मोर्चात सामिल झाले. आंदोलकांनी मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी धडक देण्याचा प्रयत्न केला. मात्र सुरक्षा जवानांनी आंदोलकांना मुख्यमंत्री निवासस्थानापासून सुमारे २०० मी. अंतरावर पॅलेस गेट येथे रोखले.

त्यानंतर आंदोलकांच्या



शिष्टमंडळाने मुख्यमंत्री वाय खेमचंद सिंह यांना निवेदन दिले. दरम्यान, पोलीस महासंचालक राजीव सिंह यांनी सांगितले की, राज्यातील संवेदनशील परिस्थिती पाहता आतापर्यंत ५ हजार ४०६ आक्षेपार्ह चिथावणीखोर अशा पोस्ट आढळल्या. त्यापैकी ३ हजार २०० पोस्ट काढून टाकले आहेत.त्याचबरोबर १८७ पेजीस आणि सोशल मीडिया अकाऊंट ब्लॉक करण्यात आली आहेत.

# सावंतवाडीचे नाव बदलले आता मधू दंडवते स्थानक

■ मुंबई

**सावंतवाडी** रेल्वे स्थानकाचे नाव 'लोकमान्य मधु दंडवते रेल्वे टर्मिनस' असे करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. कोकणातील जनतेची अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाली. हा नामकरणाचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात येणार आहे. आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

शासकीय कर्मचाऱ्यांच्या २०२६ मधील सर्वसाधारण बदल्यांना मुदतवाढ देण्यात




आली. त्यासाठी महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे नियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मध्ये सुधारणेस मान्यता देण्यात आली. डोंबिवलीतील सोनारपाड्यातील पिंपळेश्वर मंदिराला जमीन देण्याचाही निर्णय आज मंत्रिमंडळ बैठकीत झाला.

पान ७ वर

# गुरमीत राम रहीम सिंग १६ व्या वेळी पॅरोल मुक्त



■ चंदीगड

दोन महिला शिष्यांवर बलात्कार केल्याप्रकरणी २० वर्षांची शिक्षा भोगत असलेला डेरा सच्चा सौदा प्रमुख गुरमीत राम रहीम सिंग आज सकाळी हरियाणातील रोहतक येथील सुनारिया कारागृहातून ३० दिवसांच्या पॅरोलवर बाहेर आला. २०१७ मध्ये दोषी ठरल्यानंतर त्याची तुरुंगातून ही १६वी सुटका आहे. राम रहीम यांना वारंवार पॅरोल आणि फरलो देण्यावर शीख संघटनांनी यापूर्वी टीका केली होती.

पॅरोल कालावधीत डेरा प्रमुख सिरसा येथील त्यांच्या डेरामध्ये राहणार असल्याची माहिती डेराचे प्रवक्ते आणि वकील जितेंद्र खुराना यांनी दिली. त्याची ही ताजी सुटका जानेवारीमध्ये मिळालेल्या अशाच प्रकारच्या पॅरोलनंतर काही महिन्यांतच झाली आहे. त्याआधी ऑगस्ट २०२५ मध्ये त्याला ४० दिवसांची पॅरोल, एप्रिल २०२५ मध्ये २१ दिवसांचा फरलो आणि ५ फेब्रुवारीच्या दिल्ली विधानसभा निवडणुकांपूर्वी जानेवारी २०२५ मध्ये ३० दिवसांची पॅरोल देण्यात आली होती. ५ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या हरियाणा विधानसभा निवडणुकांपूर्वी १ ऑक्टोबर २०२४ रोजी त्यांना २० दिवसांची पॅरोल दिली होती. ऑगस्ट २०२४ मध्ये २१ दिवसांचा फरलो आणि फेब्रुवारी २०२२ मध्ये पंजाब विधानसभा निवडणुकांच्या अवघ्या दोन आठवडे आधी तीन आठवड्यांचा फरलोही देण्यात आला होता. शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समितीसह अनेक शीख संघटनांनी राम रहीम यांना वारंवार पॅरोल आणि फरलो देण्यावर यापूर्वी टीका केली होती.

# तेलंगणातील सरकारी शाळेत विद्यार्थ्याला काय झाले?

**सध्या सोशल मीडियावर अनेकांच्या मनाला स्पर्श करत आहे. एका शिक्षकाने आपल्या विद्यार्थ्यांना दिलेलं वचन केवळ शब्दांपुरतं मर्यादित राहिलं नाही, तर ते एका विद्यार्थ्याच्या आयुष्यातील सर्वात सुंदर आठवणींपैकी एक बनलं. ही कथा शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील विश्वास, प्रेरणा आणि स्वप्नांची ताकद दारववणारी आहे...**



गणिताचे शिक्षक मल्लिका रामकिशन राव यांनी विद्यार्थ्यांना एक खास आव्हान दिलं होतं. त्यांनी सांगितलं होतं की, जो विद्यार्थी SSC परीक्षेत ५५० पेक्षा जास्त



गुण मिळवेल, त्याला मी स्वतः विमानप्रवास घडवून आणेन. सुरुवातीला अनेक विद्यार्थ्यांना हे ऐकून आश्चर्य वाटलं. कारण सरकारी शाळेत शिकणाऱ्या अनेक मुलांसाठी विमानात बसणं हे मोठं स्वप्न असतं....

मात्र पूर्णचंदर श्रीमंथुला या विद्यार्थ्याने आपल्या मेहनतीच्या जोरावर हे स्वप्न वास्तवात आणलं. त्याने SSC बोर्ड परीक्षेत तब्बल ५५४ गुण मिळवत शिक्षकांनी ठेवलेलं लक्ष्य पूर्ण केलं. त्याच्या या यशामुळे शिक्षकांचं वचनही पूर्ण करण्याची वेळ आली.....

आपलं दिलेलं वचन पाळत मल्लिका रामकिशन राव यांनी स्वखर्चाने पूर्णचंदरला त्याच्या आयुष्यातील पहिला विमानप्रवास घडवून आणला. जो मुलगा आतापर्यंत आकाशात उडणाऱ्या विमानांकडे फक्त पाहत होता, तो आता ढगांच्या वरून जग अनुभवत होता.

हा फक्त विमानप्रवास नव्हता, तर एका विद्यार्थ्याच्या स्वप्नांना पंख देण्याचा प्रयत्न होता....

आजच्या काळात अशा घटना समाजासाठी मोठी प्रेरणा ठरतात. शिक्षक फक्त पुस्तकी ज्ञान देत नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या मनात मोठी स्वप्न पाहण्याची हिंमत आणि ती पूर्ण करण्याचा आत्मविश्वासही निर्माण करतात.....

# आर्णीत शिंदे गटाच्या नगरसेवकाला मारहाण

■ यवतमाळ

**यवतमाळ** जिल्ह्यातील आर्णी नगरपालिकेत शिंदे गटाचे नगरसेवक पवन चाफले यांच्यावर पालिका इमारतीतच बेदम मारहाण करण्यात आली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

पवन चाफले हे उपनगराध्यक्षांच्या कॅबिनमध्ये बसले असताना दोन जण अचानक आत घुसले. क्षुल्लक कारणावरून वाद निर्माण करत त्यांनी चाफले यांच्यावर लोखंडी रॉडने हल्ला चढवला. या हल्ल्यात चाफले यांच्या उजव्या हाताला गंभीर दुखापत झाली आहे. घटनेनंतर जखमी चाफले यांना तातडीने उपचारासाठी दाखल करण्यात आले.

दरम्यान, रात्री उशिरा आर्णी पोलीस ठाण्यात दोन्ही हल्लेखोरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापैकी एका आरोपीची ओळख पटली असून, दुसरा आरोपी अद्याप फरार आहे. जखमी नगरसेवकाचा वैद्यकीय अहवाल आल्यानंतर आरोपींवर आणखी गंभीर कलमे लावली जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# २३ वर्षीय भारतीय तुषार कुमार ब्रिटनचा सर्वात तरुण महापौर

**आईचीही महापौरपदी निवड**

■ लंडन

**हरियाणातील** रोहतक येथील दहिया या भारतीय कुटुंबाने ब्रिटनमध्ये इतिहास रचला. २३ वर्षीय तुषार कुमारची सर्वात तरुण भारतीय वंशाचा महापौर म्हणून निवड झाली. तर त्याची आई परवीन राणी यांचीही महापौरपदी निवड झाली. त्यामुळे एका भारतीय कुटुंबातील आई आणि मुलगा एकाच वेळी महापौर झाल्याने सर्वत्र कौतुक होत आहे.

हरियाणातील सोनीपत जिल्ह्यातील रोहना हे या कुटुंबाचे मूळ गाव आहे. २०१३ मध्ये हे कुटुंब यूकेमध्ये स्थलांतरित झाले. तुषारचे वडील सुनील दहिया यांनी सांगितले की, आम्ही युकेत आलो, तेव्हा



तुषार फक्त १० वर्षांचा होता. भविष्यात असा मोठा सन्मान मिळेल, याची कल्पनाही आम्ही केली नव्हती.

तुषारची एल्स्ट्री आणि बोरहॅमवुड कौन्सिलच्या महापौरपदी निवड झाली आहे. तो या नगरपरिषदेचा आतापर्यंतचा सर्वात तरुण महापौर ठरला. त्यानंतर अवघ्या आठवडाभरात त्याची आई परवीन राणी यांची हर्ट्समेअर कौन्सिलच्या पहिल्या भारतीय वंशाच्या महापौर म्हणून निवड झाली. तुषार आणि त्याची आई दोघांनाही समाजसेवेची आवड आहे. दोघेही ब्रिटनमध्ये जन्मलेल्या आणि वाढलेल्या मुलांना मोफत हिंदी शिकवत होते. ते 'हिंदी शिक्षा परिषद' या संस्थेशीही जोडलेले आहेत. तुषारने वयाच्या २० व्या वर्षी नगरसेवक म्हणून निवडणूक जिंकली होती. तो किंग्ज कॉलेज लंडनमधून शिक्षण घेत आहे.

# विठ्ठल दर्शनासाठी निघालेल्या कुटुंबाचा अपघात! माय-लेकाचा जागीच मृत्यू

■ सांगली

**विठ्ठल** दर्शनासाठी पंढरपूरकडे निघालेल्या पलूस येथील भोसले कुटुंबियांच्या कारचा अपघात झाला. सांगली-सोलापूर महामार्गावरील जुनोनी गावाजवळ झालेल्या अपघातात आई आणि मुलाचा जागीच मृत्यू झाला असून, अन्य सहा जण गंभीर जखमी झाले आहेत.

संदीप चिंतामणी भोसले (२८) आणि त्यांच्या आई रेखा चिंतामणी भोसले (५२) अशी मृतांची नावे आहेत.



पलूस येथील रहिवासी असलेले संदीप भोसले हे आपल्या कुटुंबियांसह कारने पंढरपूरला विठ्ठल दर्शनासाठी निघाले होते. सांगली-सोलापूर महामार्गावरील जुनोनी गावाच्या हद्दीत हा अपघात घडला. अज्ञात वाहनाला वाचवण्याच्या प्रयत्नात कार पलटी झाली. अपघाताची तीव्रता इतकी होती की कारचा अक्षरशः चक्काचूर झाला. अपघाताचा मोठा आवाज ऐकून स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. कारमध्ये अडकलेल्या जखमींना बाहेर काढून त्वरित जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या अपघातात संदीप यांचे मोठे भाऊ अनिल भोसले यांच्या पत्नी विद्या भोसले (२९) गंभीर जखमी झाल्या असून, संदीप यांच्या पत्नी पूजा भोसले यांच्या हाताला गंभीर दुखापत झाली आहे.

# कोल्हापुरात हरला, पुण्यात पक्ष सपाट केला! सतेज पाटलांविरोधात बॅनरबाजी

■ पुणे

**पुण्यात** काँग्रेसमध्ये सुरू असलेला अंतर्गत संघर्ष आता उघड झाला आहे. काँग्रेसचे प्रभारी म्हणून काम पाहणारे सतेज पाटील यांच्याविरोधात पुण्यात ठिकठिकाणी बॅनर लावून नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. या बॅनरमुळे पक्षातील मतभेद चव्हाट्यावर आले असून, कार्यकर्त्यांमध्ये असंतोष वाढत असल्याचे स्पष्ट झाले आहे. शहरात लागलेल्या बॅनरवर 'कोल्हापूरचा पैलवान पुण्यात आला, कोल्हापुरात हरला आणि पुण्यातही पक्ष सपाट केला' असा थेट टोला सतेज पाटील यांना लगावण्यात आला आहे. या आक्रमक बॅनरबाजीमुळे काँग्रेसमध्ये सुरू असलेली गटबाजी उघड झाली आहे. पुण्यात काँग्रेसची संघटनात्मक स्थिती कमकुवत होत असल्याची टीका आधीपासूनच होत होती. त्यातच आता उघड नाराजी व्यक्त होत असल्याने पक्ष नेतृत्वासाठी ही गंभीर बाब मानली जात आहे. हा अंतर्गत वाद काँग्रेससाठी डोकेदुखी ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# नाशिकमध्ये आणखी एका भोंदूबाबावर गुन्हा

■ नाशिक

**भोंदू** बाबा अशोक खरात प्रकरणानंतर आता नाशिकमध्ये आणखी एका भोंदूबाबाविरोधात गुन्हा दाखल झाल्याने खळबळ उडाली आहे. कमलेश अधिकारी नावाच्या व्यक्तीविरोधात इंदिरानगर पोलीस ठाण्यात अंधश्रद्धा, अघोरी पूजा आणि फसवणुकीचे गंभीर आरोप नोंदवण्यात आले आहेत.

कमलेश अधिकारीने सोलापूर येथील दोन भावांना




मृत्यूयोग असल्याची भीती दाखवून लाखो रुपये उकळले. तसेच दैवी तोडगे, अघोरी पूजा आणि उपचारांच्या नावाखाली त्यांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. याचबरोबर उज्जैन येथे स्मशानभूमीत अघोरी पूजा, पशूंचे बळी आणि तथाकथित दैवी उपचारांच्या नावाखाली शोषण केल्याचाही आरोप त्याच्यावर आहे. धक्कादायक बाब म्हणजे, मठ बांधण्याच्या बहाण्याने पीडितांची सुमारे दोन एकर जमीन स्वतःच्या नावावर करून घेतल्याचाही गंभीर आरोप आहे. या प्रकरणी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या (अंनिस) प्रयत्नांनंतर गुन्हा दाखल करण्यात आला असून, इंदिरानगर पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. या कारवाईमुळे भोंदूबाबांविरोधात पुन्हा एकदा कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे.

# जनगणनेचे कर्तव्य बजावताना शिक्षकाचा हार्ट अ‍ॅटॅकने मृत्यू

■ सांगोला

**जनगणनेचे** राष्ट्रीय कर्तव्य बजावत असताना सांगोल्यातील एका ४९ वर्षांच्या शिक्षकांचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला. राजाराम दामोदर ढोले (४९) असे या मृत शिक्षकाचे नाव आहे.

राजाराम ढोले हे सांगोल्यातील विद्यामंदिर प्रशालेत सहशिक्षक म्हणून काम करीत होते. त्यांची जनगणना प्रगणक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. ढोले हे जनगणनेच्या कर्तव्यासाठी सांगोला शहराजवळच्या गावडेवस्ती परिसरात गेले होते.सोमवारी सकाळी साधारण पावणे दहाची वेळ होती. घरोघरी जाऊन माहिती गोळा करत असतानाच अचानक त्यांना अस्वस्थ वाटू लागले. त्यानंतर काही क्षणातच त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यातच त्यांचा मृत्यू झाला.

# ठाणे जिल्ह्यात तीव्र पाणीटंचाई ३९ गावांना टँकरने पाणीपुरवठा



■ ठाणे

**जिल्ह्यातील** ग्रामीण भागात उन्हाळ्याच्या तीव्र झळांमुळे पाणीटंचाई निर्माण झाली आहे. जिल्हा प्रशासनाच्या नियोजनानुसार, सध्या शहापूर आणि मुरबाड या दोन तालुक्यांमधील मिळून तब्बल ३९ गावे आणि १३७ पाड्यांमधील ५८ हजारांहून अधिक नागरिकांना ४० टँकर्सद्वारे अविरत पाणीपुरवठा केला जात आहे.

पाणी टंचाईसंदर्भात शहापूर तालुक्यात विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. शहापूर तालुक्यातील ३३ गावे व १२७ पाड्यांमधील सुमारे ५२ हजार ७७७ नागरिकांसाठी ३७ खासगी टँकर अधिग्रहित करून नियमित पाणीपुरवठा सुरू ठेवला आहे. या टँकर्सच्या माध्यमातून दररोज प्रभावी नियोजन करून नागरिकांपर्यंत पिण्याचे पाणी पोहोचविण्यात येत आहे. तसेच मुरबाड तालुक्यातील ६ गावे व १० पाड्यांमधील ५ हजार ६६६ नागरिकांसाठी सध्या ३ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे.

# काँग्रेसचे नगरसेवक माझ्या संपर्कात नाहीत! बंटी भांगडियांचे स्पष्टीकरण

■ चंद्रपूर

**चंद्रपुरातील** काँग्रेसचे काही नगरसेवक आणि नगराध्यक्ष भाजपा आमदार बंटी भांगडिया यांच्या संपर्कात असल्याच्या चर्चेमुळे राजकीय वातावरण तापले आहे.

नागपूर येथे बंटी भांगडिया यांच्या कार्यालयात काँग्रेसचे काही पदाधिकारी आणि नगरसेवक दिसून आल्याचे फोटो व्हायरल झाल्यानंतर या चर्चांना अधिक उधाण आले आहे. यावर आता बंटी भांगडिया यांनी काँग्रेसचे नगरसेवक माझ्या संपर्कात नाहीत असे स्पष्टीकरण देत हा दावा फेटाळून लावला आहे. या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना बंटी भांगडिया म्हणाले की, काँग्रेसचे ५० ते ६० नगरसेवक नॉट रिचेबल आहेत. मी काँग्रेस नेता नाही. त्यामुळे त्यांच्या नगरसेवकांना सांभाळण्याची जबाबदारी माझी नाही. मी त्या भागाचा आमदार असल्याने विविध नगरपरिषद आणि नगरपंचायतीतील नगरसेवक त्यांच्या कामांसाठी माझ्या संपर्कात असतात. निवडणुकीच्या दृष्टीने मी कोणाशीही संपर्कात नाही. भाजपाचा कार्यकर्ता म्हणून निवडणुकीत पक्षाच्या उमेदवाराला मदत होईल, असा प्रयत्न असतो.

# प्राधिकरणाकडे रखडलेले २२४ प्रकल्प एसआरए कार्यालयाने परत घेतले

**झोपडीधारकांच्या घरांचे स्वप्न कोण पूर्ण करणार**

■ मुंबई

**राज्य** शासनाच्या निर्देशानुसार एसआरए कार्यालयाने वर्षानुवर्षे रखडलेले ५१७ प्रकल्पांपैकी २२४ प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आठ सरकारी प्राधिकरणांना दोन वर्षापूर्वी देण्यात आले होते. मात्र या प्राधिकरणांकडून प्रकल्पांबाबत कोणतीच हालचाल झाली नाही. परिणामी एसआरए कार्यालयाने २२४ पैकी १८१ प्रकल्प नुकतेच परत घेतले आहेत. यामुळे या झोपडीधारकांच्या घरांचे स्वप्न कोण पूर्ण करणार? असा प्रश्न उपस्थितीत होत आहे.

एका अभियंत्याकडून वरील मिळालेल्या माहितीनुसार मुंबई झोपडपट्टी मुक्तीचा नारा महायुती सरकारने दिला आहे. या पार्श्वभूमीवर खासगी विकासकांच्या संयुक्त भागीदारीतून (जॉईंट व्हेंचर) झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास केला जाणार आहे. या धर्तीवर ५१७ रखडलेल्या प्रकल्पातील २२४ प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मुंबई महापालिकेला ७७ प्रकल्प देण्यात आले होते. त्यातील ३३ प्रकल्प काढून घेतले. म्हाडाला २४ दिले होते, २२ काढून घेतले. एमएमआरडीएला ५ दिले ४ काढून घेतले. सिडकोने ६ घेतले होते. ६ काढून घेतले. महाप्रीतला ५७ दिले होते. ५७ काढून घेतले आहेत. एमएसआरडीसी ४६ दिले होते. ४६ काढून घेतले. एमआयडीसीकडून १२ पैकी १२ काढून घेतले. महाहौसिंग १ पैकी १ काढून घेतला आहे, असे एकूण १८१ प्रकल्प या शासकीय प्राधिकरणांकडून एसआरए कार्यालयाने परत घेतले आहेत. त्यामुळे रखडलेले प्रकल्प मार्गी लावण्यासाठी शासन काय धोरण घेते, हे पाहावे लागेल, असे मत एसआरए कार्यालयातील अभियंत्याने व्यक्त केले.



'५२ व्या हिंद केसरी' स्पर्धेचे विजेते पैलवान महेंद्र गायकवाड यांनी आज मुरव्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आज मंत्रालय, मुंबई येथे भेट घेतली.

(छाया : दीपक साळवी)

# मुरुड-बोरिवली रातराणी नवीन एसटी सेवा सुरू

**मुरुड-** तालुक्यातील प्रवाशांसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर यांनी केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले असून, मुरुड आगारातून आता मुरूड-बोरीवली रातराणी एसटी सेवा नव्याने सुरू करण्यात आली आहे. दररोज रात्री १०.३० वाजता ही गाडी मुरुड आगारातून सोडली जाणार आहे. मुरूड आगारातून रात्रीच्या वेळी मुरूड - बोरीवली एसटी सेवा सुरू करावी, अशी मागणी अरविंद गायकर यांनी महिनाभरापूर्वी राज्य परिवहन मंडळाच्या रायगड विभागीय नियंत्रक तसेच मुरूड आगार व्यवस्थापकांकडे निवेदनाद्वारे केली होती. या निवेदनाची दखल घेत रायगड विभागीय नियंत्रक सुहास चौरे यांनी मुरूड आगार व्यवस्थापक राहुल शिंदे यांना मुरूड-बोरीवली रातराणी सेवा सुरू करण्याचे निर्देश दिले.

# अकरावी प्रवेशाची पहिली यादी २९ मे रोजी जाहीर होणार

■ मुंबई

**अकरावी** प्रवेश प्रक्रियेतील पहिली प्रवेश यादी २९ मे रोजी जाहीर होणार असून, त्याच दिवशी दुपारी १२ वाजल्यापासून प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. प्रवेश अर्जातील भाग एक आणि भाग दोनमधील माहिती भरण्याची अंतिम मुदत २५ मे रोजी संपली आहे.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाच्या प्रवेश कक्षाने दिलेल्या माहितीनुसार, पहिली यादी शुक्रवार, २९ मे रोजी सकाळी ११ वाजता ऑनलाईन प्रसिद्ध केली जाईल. संबंधित कनिष्ठ महाविद्यालये आणि विद्यार्थ्यांना एसएमएसद्वारेही प्रवेशाची माहिती कळवण्यात येणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना महाविद्यालय देण्यात आले आहे त्यांना २९ मे रोजी दुपारी १२ वाजल्यापासून प्रवेश घेता येणार आहे. ही प्रवेश प्रक्रिया ३ जून रोजी सायंकाळपर्यंत सुरू राहणार आहे. या कालावधीत व्यवस्थापन कोटा, संस्था अंतर्गत (इनहाऊस) कोटा आणि अल्पसंख्याक कोट्याअंतर्गतही प्रवेश दिले जाणार आहेत.

**प्रवेश प्रक्रिया ३ जून पर्यंत सुरू राहणार**

विद्यार्थ्यांचे प्रवेश सुलभ आणि वेळेत पूर्ण व्हावेत यासाठी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांनी यादीतील विद्यार्थ्यांशी संपर्क साधून त्यांचे प्रवेश निश्चित करावेत, असे निर्देश राज्याचे शिक्षण संचालक डॉ. महेश मालकर यांनी दिले आहेत.

यासंदर्भात त्यांनी सर्व कनिष्ठ महाविद्यालये, शिक्षणाधिकारी आणि शिक्षण उपसंचालकांना पत्र पाठवले आहे. दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर गेल्या दोन आठवड्यांपासून अकरावी प्रवेश प्रक्रियेला वेग आला होता. सुरुवातीला संकेतस्थळावर तांत्रिक अडचणी आणि संथगतीमुळे विद्यार्थी व पालकांना त्रास सहन करावा लागला. आता त्या अडचणी दूर करण्यात आल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

# सोयगावमध्ये पिसाळलेल्या कुत्र्यांचा सात जणांना चावा

■ छत्रपती संभाजीनगर

**जिल्ह्यातील** सोयगाव शहरात अचानक पिसाळलेल्या कुत्र्यांनी धुमाकूळ घालून एक ते दीड तासात तब्बल सात ते आठ जणांना त्यांच्या अंगाचे लचके तोडून गंभीर जखमी केले. काल सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास शहरातील गजानन महाराज मंदिर परिसरात ही घटना घडली.

या पिसाळलेल्या कुत्र्यांनी सुरुवातीला अंगणात खेळत असलेल्या अथर्व पंकज परदेशी (३) याच्यावर शिवाजीनगर आमखेडा परिसरात हल्ला केला. या घटनेत गंभीर जखमी झालेल्या अथर्वला तातडीने जळगावच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. या घटनेनंतर पुन्हा सात ते आठ जणांना या कुत्र्यांनी गंभीर जखमी केले. या घटनेमुळे शहरातील नागरिकांमध्ये प्रचंड दहशत पसरली आहे.

# मागच्या जन्मी नागीण होतीस म्हणत सांगलीत अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**तीन भोंदूंवर गुन्हा दाखल**

■ सांगली

**सांगलीतील** विटा परिसरातील कडेश्वर धाम आश्रमातील तिघा कथित भोंदू बाबांविरोधात अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अंधश्रद्धा, मानसिक फसवणूक आणि धमक्यांच्या माध्यमातून मुलीचे शोषण केल्याचा आरोप असून, या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

महेश मोहन बाबर (३८), संकेत संदीप निकम (२५) आणि सूरज उपाध्ये (२५) अशी संशयितांची नावे आहेत. १ जून २०२४ ते १२ मे २०२६ या कालावधीत हा प्रकार घडला. पीडित अल्पवयीन मुलगी शारीरिक त्रास आणि पित्ताशयाच्या आजारामुळे आश्रमात येत होती. त्यावेळी संशयित महेश बाबर आणि संकेत निकम यांनी संकेत हा शंकर बाबा, महाकाल, बाळूमामा आणि चिले महाराज यांचा अवतार असल्याचे भासवून मुलीचा विश्वास संपादन केला. तसेच तिच्या शरीरात अंबाबाई देवीचा संचार होत असल्याचे सांगून पूजा, हवन आणि धार्मिक विधी करण्यास भाग पाडण्यात आले. त्यानंतर तू मागच्या जन्मी नागीण होतीस आणि संकेतबाबा नाग होता. तुमचे लग्न व्हावे म्हणूनच या जन्मी तुमचा जन्म झाला आहे असे सांगून मुलीची मानसिक फसवणूक करण्यात आल्याचा आरोप आहे. संकेत निकम याने विटा येथील एका खोलीत अल्पवयीन मुलीवर वारंवार जबरदस्तीने अत्याचार केला.

# शेअर बाजारात मोठी घसरण दिवसभर कमालीची अस्थिरता

■ मुंबई

**भारतीय** शेअर बाजारात काल सोमवारच्या उसळीनंतर आज दुसऱ्याच दिवशी कमालीची अस्थिरता दिसून आली. दिवसभराच्या चढ-उतारानंतर दोन्ही प्रमुख निर्देशांक घसरणीसह बंद झाले. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स ४७९.२६ अंकांनी कोसळून ७६,००९.७० अंकावर बंद झाला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी ११८ अंकांच्या घसरणीसह २३,९१३.७० अंकांवर स्थिरावला. आज अपोलो हॉस्पिटल, भारती एअरटेल, टीसीएस, विप्रो आणि ट्रेंट या कंपन्यांना सर्वाधिक फटका बसला.तर अदानी एन्टरप्राईझेस, टाटा मोटर्स, टेक महिंद्रा, नेस्ले इंडिया या कंपन्यांच्या समभागांमध्ये तेजी दिसून आली.

नवा काळ
Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in

# 'गोलमाल ५'चे चित्रीकरण आटोपले!



**अभिनेता** तुषार कपूर याने 'गोलमाल ५' या बहुप्रतीक्षित चित्रपटाच्या चित्रीकरणाबाबत अत्यंत महत्त्वाची माहिती दिली आहे. एका विशेष मुलाखतीत त्याने सांगितले की, या चित्रपटाचे ८० ते ९० टक्के चित्रीकरण पूर्ण झाले आहे. आपल्या सहकलाकारांसोबत आणि दिग्दर्शक रोहित शेट्टी यांच्यासोबत पुन्हा एकदा काम करण्याचा अनुभव अत्यंत आनंदाचा होता, असे त्याने नमूद केले. रोहित शेट्टी हे अत्यंत मेहनती आणि व्यावसायिक दिग्दर्शक असून, ते संपूर्ण टीमसाठी प्रेरणास्थान आहेत, असेही तो म्हणाला. या मुलाखतीत तुषारने 'गोलमाल' मालिकेतील त्याच्या अत्यंत लोकप्रिय अशा लकी या पात्राबद्दल एक रंजक खुलासा केला. सुरुवातीला लेखक नीरज वोरा यांनी हे पात्र पूर्णपणे मूक राहणारे बनवण्याचे ठरवले होते. मात्र, अभिनेता शर्मन जोशी याने तुषारला रंगभूमीवरील कलाकार विकास कदम यांच्याकडून प्रशिक्षण घेण्याचा सल्ला दिला. विकास कदम यांनीच सुचवले की, हे पात्र पूर्णपणे शांत ठेवण्याऐवजी त्याला ऐकू येत असल्यामुळे तो काही वेगळे आवाज काढून संवाद साधण्याचा प्रयत्न करतोय असे दाखवावे. हा प्रयोग कमालीचा यशस्वी ठरला आणि आज लकी हे प्रेक्षकांचे अत्यंत लाडके पात्र बनले आहे.

# रणवीरविरोधात असहकार

**'डॉन ३'** या चित्रपटावरून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर, फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने एम्प्लॉईज या संस्थेने अभिनेता रणवीर सिंग याच्याविरोधात असहकाराचा (नॉन-कोऑपरेशन) आदेश जारी केला आहे. या संपूर्ण वादावर आणि बंदीवर रणवीर सिंगच्या अधिकृत प्रवक्त्याने सविस्तर पत्रक प्रसिद्ध करून अभिनेत्याची भूमिका स्पष्ट केली आहे.

काही वृत्तांनुसार, 'डॉन ३' चित्रपटाचे चित्रीकरण सुरू होण्याच्या अवघ्या काही आठवड्यांपूर्वी रणवीर सिंगने या चित्रपटातून माघार घेतली. रणवीरने घेतलेल्या या निर्णयामुळे संतप्त झालेल्या एक्सल एंटरटेनमेंटचे निर्माते फरहान अख्तर आणि रितेश सिधवानी यांनी चित्रपट क्षेत्रातील संघटनांकडे अधिकृत तक्रार दाखल केली. या तक्रारीची दखल घेत इंडियन फिल्म अँड टेलिव्हिजन डायरेक्टर्स असोसिएशनच्या(आयएफटीडीए) शिफारशीवरून 'एफडब्ल्यूआयसीई'ने रणवीर सिंगशी संबंधित प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत त्याच्यासोबत असहकार पुकारण्याचा निर्णय जाहीर केला.

रणवीरने या संपूर्ण वादावर जाणीवपूर्वक मौन बाळगणे पसंत केले आहे. सोशल मीडियावर आणि माध्यमांमध्ये अनेक तर्कवितर्क लढवले जात असले, तरी प्रत्येक अफवेवर जाहीरपणे उत्तर देणे रणवीरला योग्य वाटत नाही, असेही त्याच्या टीमने स्पष्ट केले.





# अक्षय कुमारचे 'घिस घिस घिस'



**अभिनेता** अक्षय कुमार याच्या आगामी 'वेलकम टू द जंगल' या चित्रपटातील 'घिस घिस घिस' हे गाणे नुकतेच प्रदर्शित झाले असून, ते सोशल मीडियावर प्रचंड चर्चेत आहे. या गाण्यात अक्षय कुमारसोबत भोजपुरी स्टार अक्षरा सिंग थिरकताना दिसत आहे. प्रदर्शित झाल्यापासून अवघ्या २४ तासांत या गाण्याने ६० लाखांपेक्षा जास्त व्ह्यूजचा टप्पा पार केला आहे.

हे गाणे सर्वसामान्य प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी आणि लग्नकार्ये, सोशल मीडिया रिल्स तसेच मीम पेजेसवर राज्य करण्यासाठी तयार करण्यात आले आहे. आजकाल बॉलिवूडमध्ये गाणी आधुनिक आणि अधिक देखणी करण्यावर भर दिला जात असताना, हे गाणे मात्र पूर्णपणे देशी आणि धम्माल स्वरूपाचे आहे.

# दिव्यांकाच्या घरी जुळ्यांचं आगमन



**लोकप्रिय** टीव्ही अभिनेत्री दिव्यांका त्रिपाठी आणि अभिनेता विवेक दहिया यांच्या घरी जुळ्या मुलांचे आगमन झाले आहे. २६ मे २०२६ रोजी या जोडप्याने सोशल मीडियावर एका भावुक पोस्टद्वारे ही आनंदाची बातमी चाहत्यांसोबत शेअर केली. ईश्वराने आपल्याला दुप्पट आनंद दिल्याचा उल्लेख करत त्यांनी जोडप्याच्या आयुष्यातील या नवीन पर्वाची माहिती दिली आहे. ''माझे करण अर्जुन आले...'' अशी मजेशीर कॅप्शनही या पोस्टमध्ये तिने लिहिली आहे. या घोषणेच्या अवघ्या एक दिवसापूर्वी दिव्यांका आणि विवेक यांनी त्यांच्या मॅटर्निटी फोटोशूटचे फोटो प्रसिद्ध केले होते. त्यांनी चालू वर्षाच्या मार्च महिन्यात पहिल्या गरोदरपणाची घोषणा केली होती.

त्यानंतर सोशल मीडियावरून ते सातत्याने चाहत्यांच्या संपर्कात होते. दिव्यांका आणि विवेक यांची प्रेमकथा २०१५ मध्ये 'ये है मोहब्बतें' या लोकप्रिय मालिकेच्या सेटवर सुरू झाली होती. त्यानंतर २०१६ मध्ये त्यांनी विवाह केला आणि आता लग्नाच्या १० वर्षांनंतर ते जुळ्या मुलांचे आई-वडील बनले आहेत. मनोरंजन सृष्टीतील अनेक कलाकार आणि चाहत्यांनी त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

# आलिया मारेकऱ्याच्या भूमिकेत....

**यशराज** फिल्म्सच्या आगामी 'अल्फा' या ॲक्शनपटाबाबत चित्रपटसृष्टीत मोठी उत्सुकता आहे. शिव रवेळ यांच्या दिग्दर्शनाखाली तयार होत असलेला हा चित्रपट यशराज फिल्म्सच्या 'स्पाय युनिव्हर्स'चा पुढील भाग असल्याचे म्हटले जात आहे. या युनिव्हर्समधील हा पहिलाच महिलाप्रधान चित्रपट असून, यात आलिया भट्टसोबत शर्वरी, अनिल कपूर आणि बॉबी देओल मुख्य भूमिकेत दिसणार आहेत.

या चित्रपटात आलियाची भूमिका 'पठाण'मधील शाहरुख खान, 'वॉर'मधील हृतिक रोशन किंवा 'टायगर'मधील सलमान खान यांच्या पारंपारिक हेरगिरीच्या भूमिकांपेक्षा पूर्णपणे वेगळी असेल. चित्रपटसृष्टीतील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ''आदित्य चोप्रा प्रथमच एका पात्राची पूर्वपीठिका अशा प्रकारे मांडत आ-हेत, ज्यामध्ये नायिका 'अँटी-हिरो' स्वरूपाची असेल. पारंपारिक नायक-नायिकांच्या चौकटीबाहेर जाऊन महिला ॲक्शन पात्राची अशी निर्मिती करणे हा एक धाडसी प्रयोग आहे.

आलिया भट्टच्या या भूमिकेची माहिती समोर आल्यानंतर समाजमाध्यमांवर या चित्रपटाची तुलना मार्वल सिनेमॅटिक युनिव्हर्समधील स्कार्लेट जोहान्सन हिच्या 'ब्लॅक विडो' या पात्राशी केली जात आहे. या चित्रपटात बॉबी देओलचे पात्र मुलींना लहानपणापासून प्रशिक्षित करणाऱ्या क्रूर प्रमुखासारखे असू शकते, असेही बोलले जाते. हा बहुप्रतीक्षित चित्रपट १० जुलै २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.






# 'गांधी बझार संडे मार्केट'च्या चित्रीकरणास प्रारंभ

**अभिनेता** बाबिल खान याने त्याच्या पहिल्या मल्याळम चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरुवात केली आहे. 'गांधी बझार संडे मार्केट' असे या चित्रपटाचे नाव असून, बाबू जनार्धनन या चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहेत. सध्या पश्चिम बंगालमधील सिलीगुडी येथे या चित्रपटाचे चित्रीकरण सुरू आहे. या नवीन प्रकल्पाविषयी बोलताना बाबिल म्हणाला की, मल्याळम चित्रपटसृष्टीतील कथांमधील प्रामाणिकपणा आणि भावनिक खोलीमुळे ही सिनेसृष्टी नेहमीच माझ्या हृदयात राहिली आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून अशा कथांचा भाग होणे हा माझ्यासाठी अत्यंत भावनिक आणि सर्जनशील आनंद देणारा अनुभव आहे.

बाबिल खान याने २०२२ मध्ये 'कला' या चित्रपटातून आपल्या अभिनय प्रवासाला सुरुवात केली होती. त्यानंतर त्याने 'फ्रायडे नाईट प्लॅन' आणि 'द रेल्वे मेन' या वेब सीरिजमध्ये काम केले. दक्षिण भारतीय भाषे-तील हा त्याचा पहिलाच चित्रपट असून, तो ९ ऑगस्ट २०२६ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.

# देशातील पहिला पाण्याचा सातबारा आता महाराष्ट्रात विकसित होणार

मुंबई

**पाण्याचा** बेसुमार वापर टाळण्यासाठी आणि प्रभावी जल व्यवस्थापन करण्यासाठी महाराष्ट्रात जमिनीच्या सातबाराच्या धर्तीवर पाण्याचा सातबारा विकसित करण्याचे नियोजन सुरू करण्यात आले आहे. देशात प्रथमच राबविण्यात येणारी ही योजना सुरुवातीला प्रायोगिक तत्त्वावर लागू करण्यात येणार असून, विकसित महाराष्ट्राच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल, पाणीपुरवठा व स्वच्छता तसेच ग्रामविकास विभागाच्या सचिवांसोबत मंत्रालयात बैठक घेऊन या योजनेबाबत सविस्तर चर्चा केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार ही बैठक आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. जल व्यवस्थापन क्षेत्रात काम करणाऱ्या अक्केरियम संस्थेने यासाठी पाणी लेखापरीक्षण आणि पाणी ताळेबंदची संकल्पना मांडली आहे. या माध्यमातून पाण्याचा वापर, उपलब्धता आणि त्याचे नियोजन याची नोंद ठेवण्यात येणार आहे.

सध्या जमिनीच्या नोंदीसाठी सातबारा उतारा अस्तित्वात असला तरी पाण्यासाठी अशी कोणतीही नोंद प्रणाली उपलब्ध नाही. त्यामुळे पाण्याचा वापर किती आणि कसा होत आहे, यावर नियंत्रण राहत नसल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

# कृष्णा नदीमध्ये सापडला तबबल ४० किलोचा मासा

सांगली

**येथील** हरिपूरमधील कृष्णा आणि वारणा नदीच्या संगमावर मासेमारी करणाऱ्या शौकिनांच्या गळास तब्बल ४० किलोचा मासा लागला.

याठिकाणी इतक्या वजनाचा मासा या ठिकाणी सापडण्याची ही पहिलीच वेळ आहे. हा मासा पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

भारतीय लष्करातील एक निवृत्त मेजर रणजित गायकवाड आणि त्यांच्या मित्रांना मासेमारीची आवड आहे. या मित्रांचे पथक नेहमीप्रमाणे हरिपूर येथील नदीकाठावर मासेमारी करत होते. त्यावेळी त्यांच्या गळाला एका मोठ्या माशाने झटका दिला. माशाचे वजन आणि ताकद एवढी अफाट होती की, त्याला पाण्याच्या बाहेर काढण्यासाठी या संपूर्ण ग्रुपला शर्थीचे प्रयत्न करावे लागले. अखेर कुशलतेने गायकवाड आणि त्यांच्या मित्रांनी या भल्या मोठ्या माशाला नदीबाहेर काढण्यात यश मिळवले.

# मीरा रोडमध्ये कुर्बानी शेडवरून तणाव डुक्कर आणल्याने वाद चिघळला!

मीरा भाईंदर

**मुंबई** जवळील मीरा रोड येथील पूनम क्लस्टर सोसायटीमध्ये आगामी बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर बकऱ्यांच्या कुर्बानीसाठी शेड बांधल्यावरून दोन गटांत काल मोठा वाद आणि हाणामारी झाली. हा वाद आज आणखी चिघळला. हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी हनुमान चालिसाचे पठण सुरू केले तर बजरंग दल कार्यकर्ते सोसायटीच्या परिसरात डुक्कर घेऊन आले. यामुळे येथील वातावरण अधिकच तणावग्रस्त बनले. त्यातच भाजपा नेते किरीट सोमय्या तिथे पोहोचले.

रहिवाशांच्या तक्रारीनंतर मीरा-भाईंदर पालिकेच्या पथकाने काल दुपारी कारवाई करत तो शेड पाडून टाकला. पालिकेच्या कारवाईनंतर रात्रीच्या वेळी पुन्हा तिथे शेड उभारण्याचा प्रयत्न सुरू झाल्याचा आरोप करत दोन्ही गट आमनेसामने आले. याचे रूपांतर मोठ्या हाणामारीत झाले आणि यामध्ये एका तरुणावर ब्लेडने हल्ला झाला. काही हिंदुत्ववादी संघटनांच्या कार्यकर्त्यांनी प्रतिवाद किंवा निषेध म्हणून सोसायटी परिसरात डुक्कर आणले. या प्रकारामुळे दोन्ही बाजूचे नागरिक संतप्त झाले आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून आणि सोसायटीत जबरदस्ती घुसण्याचा प्रयत्न करणाऱ्या जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी कार्यकर्त्यांवर लाठीमार केला. त्यानंतर बकरे टेम्पोमध्ये घालून दुसरीकडे नेण्यात आले.

# धारूर घाटातील काम अडीच वर्षे रखडले

**बीड-** बीड जिल्ह्यातून जाणाऱ्या खामगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील धारूर घाटातील रस्त्याचे काम गेल्या अडीच वर्षांपासून रखडले असून त्यामुळे अपघातांची संख्या सातत्याने वाढत आहे. अरुंद रस्ता, तीव्र उतार आणि धोकादायक वळणांमुळे गेल्या दोन वर्षांत तब्बल ६५ अपघात झाले असून २१ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. महामार्गाचे काम रखडल्यामुळे प्रवासी आणि वाहनधारकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

# पनवेलमधील नाट्यसंस्कृतीस चालना नऊ दिवसांच्या शिबिराचे आयोजन

पनवेल

**पनवेल** शहर हे औद्योगिक, शैक्षणिक आणि नागरी विकासाबरोबरच सांस्कृतिक क्षेत्रातही आपली स्वतंत्र ओळख निर्माण करत आहे. या सांस्कृतिक परंपरेला अधिक सक्षम व्यासपीठ मिळावे, नवोदित कलाकारांना अभिनयाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण उपलब्ध व्हावे आणि स्थानिक नाट्यचळवळीला नवसंजीवनी मिळावी या उद्देशाने पनवेल महानगरपालिकेने अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पनवेल शाखेच्या सहकार्याने आयोजित केलेले नऊ दिवसीय अभिनय प्रशिक्षण शिबीर हे खऱ्या अर्थाने एक सांस्कृतिक पर्व ठरले. अभिनय शिबीराचे हे दुसरे वर्ष असून, पनवेल या शिबीरामुळे क्षेत्रातील नाट्य संस्कृतीला नव संजीवनी मिळाली.

पनवेल, कळंबोली आणि खारघर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या शिबिराला विविध वयोगटातील कलावंत, विद्यार्थी, शिक्षक आणि नाट्यप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# ठाणे ग्रामीण पोलिसांची 'बेली' काळाच्या पड्द्याआड

ठाणे

**ठाणे** ग्रामीण पोलीस दलातील अनेक गुन्ह्यांची उकल करणारी पोलिसांची विश्वासू सहकारी आणि श्वान पथकातील धाडसी डॉबरमन जातीची 'बेली' काळाच्या पडद्याआड गेली.

तब्बल ९ वर्षे पोलीस दलात निष्ठेने सेवा बजावलेल्या बेलीला काल सोमवारी ठाण्यातील वागळे इस्टेट येथील बीडीडीएस मैदानात अत्यंत भावनिक वातावरणात अखेरचा निरोप देण्यात आला. ठाणे ग्रामीणच्या उपविभागीय पोलीस अधिकारी नीलम वाव्हळ यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बेलीच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहिली.

यावेळी पोलिसांकडून फैरींची सलामी देत या शूर श्वानाला मानवंदना देण्यात आली. अनेक गुन्ह्यांच्या तपासात महत्त्वाची भूमिका बजावणारी बेली केवळ श्वान नव्हती, तर पोलीस दलातील प्रत्येकासाठी ती कुटुंबातील सदस्यासारखी होती.

पडघा, शहापूर, मुरबाड परिसरात अनेक बंद घरांमध्ये झालेल्या घरफोड्यांचा तपास लावण्यात बेलीची मदत घेतली होती. महामार्गाच्या कडेला किंवा जंगलाने वेढलेल्या ग्रामीण भागात होणाऱ्या दरोड्यांच्या घटनांमध्ये आरोपी पळून जाण्यात यशस्वी व्हायचे.



बकरी ईदनिमित्त मुंबईच्या देवनार मार्केटमध्ये मोठ्या संख्येने बकरे विक्रीसाठी आणले होते.

# पेट्रोल टंचाईमुळे गोपीनाथ मुंडे पुण्यतिथी मेळावा रद्द ! पंकजा मुंडेंचा निर्णय

मुंबई

**पेट्रोल** उपलब्धतेबाबत निर्माण झालेली परिस्थिती आणि नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी यावर्षी लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त गोपीनाथ गडावर होणारा पारंपरिक मेळावा रद्द करण्याचा निर्णय कॅबिनेट मंत्री पंकजा मुंडे यांनी घेतला. यासंदर्भात त्यांनी कार्यकर्त्यांना आवाहन करणारा व्हिडिओ पोस्ट केला.

पंकजा मुंडे यांनी म्हटले की, दरवर्षी जून महिना जवळ आला की, गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम आयोजित केले जातात. पण यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांनी पेट्रोलचा वापर कमी करण्याचे आवाहन केले आहे. काही जिल्ह्यांमध्ये पेट्रोलची उपलब्धता कमी असून त्यासाठी रांगा लागत आहेत. मुंडे साहेबांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने गोपीनाथ गडावर राज्यभरातून लोक येतात. त्यांची गैरव्यवस्था होऊ नये ही जबाबदारी माझी आहे. मुंडे साहेबांची ही पुण्यतिथी प्रत्येकाने आपापले गाव,घर, गल्ली, वॉर्ड येथे साजरी करण्याचे आवाहन करते. त्याचे सर्वांचे फोटो माझ्यासोबत शेअर करावे. मी हा मोठा कार्यक्रम टाळण्यासाठी आपल्या सर्वांना विनंती करते की आपण जिथे आहात तिथूनच आपण मुंडे साहेबांच्या स्मरणार्थ त्यांना शोभेल असा कार्यक्रम घ्यावा ही माझी नम्र विनंती आहे.

# छोट्या विकासकांना कर्जमाफी द्या राज्यातील संघटनांचे केंद्राला निवेदन

मुंबई

**महाराष्ट्रातील** २५ कोटी रुपयांपर्यंत वार्षिक उलाढाल असलेल्या छोटे विकासक, सुशिक्षित बेरोजगार अभियंते आणि कंत्राटदारांना कर्जमाफी, जीएसटी माफी तसेच कमी व्याजदरात दीर्घ मुदतीचे कर्ज उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी विविध बांधकाम आणि अभियंता संघटनांनी केंद्र व राज्य सरकारकडे केली आहे.

राज्य अभियंता संघटना, महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, महाराष्ट्र डेव्हलपमेंट फोरम आणि महाराष्ट्र कन्स्ट्रक्शन फोरम यांच्या वतीने केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना यासंदर्भात लेखी निवेदन देण्यात आले आहे. संघटनांच्या म्हणण्यानुसार, गेल्या तीन ते चार वर्षांपासून राज्यातील विविध विभागांची विकासकामे पूर्ण करूनही छोट्या विकासकांना आणि कंत्राटदारांना शासनाकडून देयके मिळालेली नाहीत.

अनेकांची बिले प्रलंबित असून, गेल्या दोन वर्षांत छोट्या विकासकामांच्या निविदाही निघालेल्या नाहीत. सध्या निघणारी बहुतांश कामे १०० कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीची असल्याने त्याचा फायदा मोठ्या कंपन्यांनाच होत आहे. यामुळे छोटे विकासक, अभियंते आणि कंत्राटदार गंभीर आर्थिक संकटात सापडले असून त्यांनी वित्तीय संस्था आणि राष्ट्रीयीकृत बँकांकडून घेतलेली कर्जे फेडणे कठीण झाले आहे. त्यामुळे या वर्गाला कर्जमाफी देऊन जीएसटी माफ करण्याची मागणी केली.

# पेट्रोल-डिझेल टंचाई सुरूच मुरव्यमंत्र्यांचा पुन्हा तोच दावा

मुंबई

**राज्यातील** अनेक जिल्ह्यांमध्ये आजही पेट्रोल पंप कोरडे ठाक असल्याचे दिसून आले. अनेक ठिकाणी पंपांवर लांबच लांब रांगा दिसत होत्या. त्यातून हाणामारीचे प्रकारही काही ठिकाणी घडले. विशेषतः मराठवाडा आणि खान्देशात इंधनटंचाईची तीव्रता जास्त जाणवली. विशेषतः डिझेलच्या टंचाईमुळे शेतकरी मेटाकुटीला आला. रणरणत्या उन्हात डिझेलसाठी हातात मोठमोठे कॅन घेऊन शेतकरी रांगेत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. मात्र असे असूनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पेट्रोल-डिझेलचा तुटवडा नाहीच, असा नेहमीचाच सूर लावला. मराठवाड्यातील नांदेड, परभणी, हिंगोली, बीड आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये टंचाईची तीव्रता अधिक जाणवली. नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार जिल्ह्यांतही कमीजास्त प्रमाणात टंचाई होती.

सर्वत्र अशी परिस्थिती असताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी मात्र राज्यात पुरेसा इंधनसाठा असल्याचा दावा केला. केवळ साठेबाजीमुळे टंचाईसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. उलट राज्यात एरव्हीच्या तुलनेने काही पट जास्त पुरवठा होत आहे, असा दावा मुख्यमंत्र्यांनी केला.

## नवाकाळ शब्दकोडे-१६१८



**आडवे शब्द –**

१. समाजविघातक कृत्ये करणारा ६. नियमभंग ८. सुवास ११. पुराणातील अप्सरा, पुरूरव्याची पत्नी १२. डोळ्याच्या उघड्या पृष्ठभागावरील गोलाकार पारदर्शक आवरण १५. तबेला१६. आई १७. हातशिलाईचा प्रकार १८. कुठे इंद्राचा ऐरावत कुठे ××××× ××× (एक म्हण) २१. घाणेरडे २२. भूतकालीन २३. गर्दी २५. गाण्याची गती २६. पर्ण २८. वर्ष, साल ३०. खेळी, चाल ३२. दहशत, भय ३३. अतिशय वजनदार ३४. निर्दालन ३६. जाड सतरंजी ३७. झुंज ३९. शंकर ४०. त्यजन ४१. भगिनी ४२. पात्र, योग्य ४४. जात, जाती ४७. टांग ४८. स्त्री ४९. कंड ५०. भ्रष्टाचारी व्यक्ती ५२. तरुणी ५३. पर्वा ५४. बटाट्याचा उपवासाला चालणारा पदार्थ ५५. पक्का, ठाम ५६. गाढव ५८. लांब ५९. मर्यादा, मुलींचे एक नाव ६१. घट्ट ६२. लेखणी ६४. ताक घुसळण्याचे साधन ६७. उणे ६८. विष ६९. खंडणीसाठी ताब्यात घेतलेला मनुष्य ७०. शेवट ७१. देवकीचा शूर पुत्र ७२. फिर्याद ७४. अकरावा महिना ७५. मनाई करणारे वा चूक दर्शवणारे चिन्ह ७६. आम्र ७७. दोषारोप ७८. आवड ७९. पालिकेतील लोकप्रतिनिधी ८१. पलीकडचा किनारा ८३. दया ८५. छत ८७. सुका चारा ८८. शनिवार ९२. चारपैकी गायला जाणारा एक वेद ९४. सरशी ९६. उष्णता, ऊब ९७. भवानी मातेने ठार केलेला राक्षस १००. आणीबाणीच्या प्रसंगी धीराने वागणारा १०२. वाणीचा एक प्रकार १०४. कसदार १०६. ताकीद १०८. मच्छर १०९. अफवेच्या स्वरूपात ऐकलेले, तथ्यहीन ११०. हेळसांड १११. संबंध तोडणे ११२. पायताण

**उभे शब्द –**

१. संन्यास घेणे २. मक्षिका ३. कंपित ४. टिंगल ५. कारस्थानी ६. घरात अडगळीच्या जागी आढळणारा प्राणी ७. ढाक्क्याचे प्रसिद्ध कापड ९. मजा १०. पायजमा १३. फूटपाथवरचे अनधिकृत दुकान १४. भांडण १५. पराभव करणे १९. घाबरलेला २०. सार्थक (होणे) २४. मातीचा कुंभ २७. अडचण २८. खरे २९. ओहोटीनंतर उरलेल्या वाळूपासून झालेली खारजमीन ३१. वर्तुळ ३३. आज्ञा धुडकावणे ३५. वादात अचानक बाजू बदलणे ३६. प्रकट ३८. रेटारेटी ४१. विड्याच्या पानाची मोठ्या आकाराची जात ४२. शरम ४३. जुने गाजलेले नाटक ×××× बाईंडर ४५. बाण ४६. उपकृत ४७. ताकीद ४९. संसदसदस्य ५१. गूळ यापासून बनवतात ५२अ. मदिरा ५७. शकुंतलेचा मुलगा ६०. जुन्या वाड्यात स्वयंपाकघर आणि ओटी यांच्यामधली खोली ६३. रोगप्रतिबंधक औषध ६५. करड्या मानेचा काकपक्षी ६६. वेतन ६९. चिंच-गुळाचे पाणी घातलेली भेळ ७०. मंगळ ग्रह ७१. कंजूष ७३. क्षय, उतरती कळा ७४. थांगपत्ता ७५. मोफत ७६. दक्षकन्या ७७. लुच्चेगिरी ८०. चाकरी ८२. आकर्षून घेणारे ८४. आवड जोपासणारे काम ८६. पळून गेलेला ८८. शाही पलंग ८९. व्यापारी ९०. रम्य ९१. नखशिखांत बुरखा ९३. डाका ९५. तंबाखूचे चूर्ण ९६. द्रव स्वरूपातील आयुर्वेदिक औषध ९८. थंडी ९९. रामायणात वालीचा भाऊ १०१. नोकर १०३. मानाची मराठमोळी उपाधी १०५. बरोबर १०६. निद्राभंग १०७. भिक्षा १०९. तोरा •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६१७ चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. गाशा ४. विघ्न ६. अभिनेता १०. नग १२. जुजबी १३. पसारा १५. मोदक १७. काकडआरती २०. वटवृक्ष २२. थेऊर २४. पडवी २५. बजरंगबली २७. मकर २८. छत्री २९. रमी ३१. दाह ३३. बासरी ३६. किरीट ३८. रसभरीत ४१. जमतील भुते ४३. चल ४५. जावळ ४८. दास्य ४९. केवल ५०. जलचर ५३. नातलग ५५. शर ५६. तरू ५८. दशमग्रह ६०. तागा ६१. ऐक्य ६३. पट्ट ६५. यक्ष ६६. कव ६८. दोष ६९. कावकाव ७०. नुकसान ७२. शक ७४. कातळ ७५. तीज ७६. चेतक ७७. लाख ७९. नळी ८१. सलामत ८५. सकाळ ८६. जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे ८८. पारख ८९. पानगळ ९०. जरब ९१. लटपट ९३. पवनार ९६. सराईत ९८. नीट ९९. बकरा १००. यथा १०१. शेपटी १०२. भलता १०३. अवनत १०४. उपरती १०५. सूर

**उभे शब्द** : १. बजबजपुरी ३. शाप ४. विराट ५. गोंद ७. भिकार ८. नेक ९. ताडपत्री १०. नरवीर ११. गती १४. सावली १५. मोक्ष १६. कथेकरी १८. आड १९. बोगदा २१. वृत्ती २३. ऊर २६. बहर २७. मस ३०. मीठ ३२. दंभ ३३. बात ३४. हिम ३५. बुभुक्षित ३६. किल्लेदार ३७. टच ३९. सवलत ४०. रिवाज ४१. जळ ४२. तीव्र ४४. लकेर ४५. जाच ४६. वरद ४७. आगगाडी ५१. लक्ष्य ५२. समक्ष ५३. नाहक ५४. लता ५५. शक्य ५७. रूपवती ५९. शयन ६१. ऐष ६२. भोवळ ६४. ब्रेक ६७. वश ६८. दोहन ६९. कातरवेळ ७१. अंतरपाट ७३. कलाकार ७८. खळखळाट फार ८०. लोच्या ८१. सतेज ८२. लाव्हारस ८३. मकबरा ८४. तळे ८५. सपाट ८६. जागरूकता ८७. वंचना ८९. पाश ९१. लत ९२. पदपथ ९४. वर्षाव ९५. रयत ९७. ईश्वर ९९. बल

# युद्धविराम! करार! काहीच नाही! अमेरिकेचा पुन्हा इराणवर हल्ला

पान १ वरून

तरी शांततेसाठी वाटाघाटी सुरू असताना अमेरिकेने केलेल्या हल्ल्यामुळे शांतता प्रक्रिया रुळावरून घसरते की काय अशी चिंता व्यक्त होऊ लागली आहे.

अमेरिका आणि इराण दोघांनाही युध्द सुरू ठेवणे नको आहे. मात्र त्याचवेळी या दोघांनाही आपापल्या मुद्यांवरून तसूभरही मागे सरकायचे नाही. त्यामुळेच शांतता करार नेमका कोणत्या अटींवर होणार यात काहीही स्पष्टता नाही. होर्मुजच्या सामुद्रधुनीवरील आपला अधिकार सोडायला इराण तयार नाही. त्याचबरोबर इराणकडे असलेले समृध्द युरेनियम हा कळीचा मुद्दा आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समृध्द युरेनियमचा मुद्दा प्रतिष्ठेचा केला आहे. अणू शस्त्र बनविण्यासाठी युरेनियम लागते. अणुशस्त्र इराणने बनवायचे नाही हा अमेरिकेचा हट्ट आहे. इराणसोबत माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांच्यासारखा करार करणार नाही. एकतर अमेरिकेच्या दृष्टीने चांगला करार तरी होईल किंवा काहीही होणार नाही, अशी आडमुठी भूमिका ट्रम्प यांनी घेतली आहे.

ट्रम्प यांच्या बोलण्याचा अर्थ असा की, इराण जोपर्यंत आपला अणुकार्यक्रम सोडून देऊन समृध्द युरेनियमचा साठा अमेरिकेच्या हाती सोपवण्यास तयार होत नाही तोपर्यंत इराणशी चांगला करार होऊ शकणार नाही. तर दुसरीकडे आपल्या अणु कार्यक्रमावर इराण ठाम आहे. कोणत्याही परिस्थितीत देशातील युरेनियम देशाबाहेर जाता कामा नये, असे आदेशच इराणचे सर्वोच्च धार्मिक नेते मोजताबा खामेनी यांनी दिला आहे. इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेजश्कियान यांनी स्पष्टच सांगितले आहे की, इराण कोणताही मोठा निर्णय सर्वोच्च नेत्याच्या मंजुरीशिवाय घेणार नाही. दुसरीकडे ज्या इस्त्रायलने इराणविरुध्द युध्दाची सुरुवात केली त्या इस्त्रायलच्या नाकावर टिच्चून इराण आजही लेबनॉन आणि हिजबुल्लाच्या पाठीशी उभा आहे. इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी नुकताच लेबनॉन आणि हिजबुल्लाच्या समर्थनार्थ संदेश जारी केला आहे.

लेबनॉनच्या सार्वभौमत्वाच्या आणि प्रादेशिक अखंडतेच्या बाजूने इराण नेहमीच उभा राहील, असे अराघची यांनी आपल्या संदेशात म्हटले आहे. अराघची यांच्या या संदेशातून इराण आपल्या भूमिकेवर ठाम आहे, असा स्पष्ट संदेश दिला गेला आहे. त्यामुळे अमेरिकेने केलेल्या हल्ल्याला इराणकडून प्रत्युत्तर दिले जाण्याची दाट शक्यता आहे. तसे झाल्यास युध्दबंदी करार आणखी लांबणीवर पडण्याची शक्यता आहे.

# कांद्याला किलोला सव्वा रुपया! शेतकरी रडवेला
# फडणवीस म्हणतात फोटोसाठी नेते आंदोलनात

पान १ वरून

तर ते आत्महत्या करतील. येणारे वर्षही दुष्काळी आहे. त्यामुळे मिळकत नाही. अवकाळी व गारपीटीने आधीच शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, असे रोहित पवार म्हणाले. बारा रुपयांत कांद्याचा उत्पादन खर्चदेखील भागत नाही. सरकारने शेतकऱ्यांकडून २४ रुपये प्रति किलो दराने कांदा खरेदी करावा आणि वाटल्यास तो परदेशात विकावा.

नाफेडने थेट बाजार समितीतून कांदा खरेदी केला तर खऱ्या अर्थाने शेतकऱ्याला त्याच्या कष्टाचे उचित मोल मिळेल, असे रोहित पवार पुढे म्हणाले. राज्यातील महायुतीचे सरकार म्हणजे 'बोलाचा भात आणि बोलाची कढी', असा सारा मामला आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्याची काय अवस्था झाली आहे याच्याशी सरकारला काही देणेघेणे नाही. कांद्याला हमीभाव देण्यासाठी सरकारला दिल्लीला जावे लागते हे लाजिरवाणे आहे. सरकार जर शेतकऱ्याकडे असेच दुर्लक्ष करणार असेल तर यापुढचे आंदोलन मंत्रालयासमोर केले जाईल. एकाही मंत्र्याला मंत्रालयात शिरू देणार नाही, असा इशारा उबाठाचे अंबादास दानवे यांनी दिला.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ बैलगाडीतून आंदोलनस्थळी आले होते. संकटात सापडलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्याला रास्त भाव देण्याऐवजी दहा-बारा रुपयांत कांदा खरेदी करताना सरकारला लाज वाटली पाहिजे, असे सपकाळ म्हणाले.

नागपूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या नेतृत्वाखाली इंधन दरवाढीच्या निषेधार्थ सायकल मोर्चा काढण्यात आला. केंद्रातील मोदी सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे इंधन संकट ओढवले आहे.

आता आंतरराष्ट्रीय स्तरावर कच्च्या तेलाच्या दरात घसरण झाली आहे. त्याचा लाभ सरकारने देशवासीयांना दिला पाहिजे. इंधन दरवाढ मागे घेतलीच पाहिजे, अशी मागणी देशमुख यांनी केली. सोलापुरात काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांवरून रास्तारोको आंदोलन करण्यात आले. आंदोलक शेतकऱ्यांनी सोलापूर-हैदराबाद महामार्ग काही काळ रोखून धरला. तर सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीसमोर कांदे फेकून शेतकऱ्यांनी सरकारचा निषेध केला. यावर टीका करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, प्रणिती शिंदे पहिल्यांदाच खासदार झाल्या आहेत. त्यांच्या बोलण्यातून त्यांचा अपरिपक्वपणा दिसतो. छत्रपती संभाजीनगरमध्ये संतप्त शेतकऱ्यांनी गंगापूर-वैजापूर महामार्गावर आंदोलन केले. गंगापूर कृषी उत्पन्न बाजार समितीसमोर शेतकऱ्यांनी कांदे फेकून आपल्या संतप्त भावना व्यक्त केल्या. आज येथे कांद्याला क्विंटलला १०० ते १३० रुपये भाव होता.

**९ मे १९५० रोजी रॉबर्ट शुमन या फ्रान्सच्या मंत्र्यांनी आपल्या भाषणात युरोपच्या आर्थिक आणि राजकीय एकीकरणाचा विषय मांडला. अशा एकीकरणामुळे युद्ध टाळणे शक्य होईल असे त्यांचे मत होते. कोळशाच्या आणि पोलादाच्या उत्पादनाचे आणि वापराचे व्यवस्थित नियोजन केले म्हणजे युरोपचे बरेच प्रश्न सुटतील, असा मुद्दा त्यांनी मांडला. त्यांच्या विचारानुसार पुढील वर्षी काही करार करण्यात आले.**




## युरोप

**दुसऱ्या** महायुद्धानंतर युरोपात युद्ध टाळून शांतता प्रस्थापित करण्याच्या हेतूने बेल्जियम, जर्मनी, फ्रान्स, इटली, लक्समबर्ग आणि नेदरलँड्स हे सहा देश एकत्र आले आणि त्यांनी १९५७ साली युरोपिय आर्थिक समुदायाची (European Economic Community - EEC) स्थापना केली. देश आर्थिकदृष्ट्या एकमेकांवर अवलंबून असतील तर त्यांच्यामध्ये संघर्ष होण्याची शक्यता कमी होत जाते हे तत्त्व त्यामागे होते.

सप्टेंबर २०१६-२८ - क्रोएशिया हा २०१३ मध्ये सामील झालेला सर्वात नवीन सदस्य देश. यु. के. ने युनियनमधून बाहेर पडण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. ती पूर्ण झाल्याने सदस्य संख्या २७ झाली.





१९५१ मध्ये बेल्जियम, जर्मनी, फ्रान्स, इटली, लक्झमबर्ग आणि नेदरलँड्स या सहा देशांनी युरोपियन कोल अँड स्टील कम्युनिटीची स्थापना केली. १९५७ मध्ये याच सहा देशांनी युरोपिय आर्थिक समुदायाची स्थापना केली. १९७३ मध्ये या संघटनेचा पहिला विस्तार झाला. डेन्मार्क, आयर्लंड आणि युके त्यामध्ये सामील झाले. त्यामुळे संघटनेची सदस्य संख्या ९ झाली. १९८१ मध्ये ग्रीस सामील झाला. १९८६ मध्ये स्पेन आणि पोर्तुगाल हे दोन देश सामील झाल्यामुळे सदस्य संख्या १२ झाली. १९९५ मध्ये ऑस्ट्रीया, फिनलंड आणि स्वीडन सामील झाल्यामुळे १५ सदस्यांच्या या संघटनेत पश्चिम युरोपमधील जवळ जवळ सर्वच देश सामील झाले. १९८९ मध्ये बर्लिनची भिंत पाडल्यानंतर पूर्व युरोपातील अनेक साम्यवादी राजवटी कोसळल्या. २००४ मध्ये यापैकी १० देश इयु मध्ये सामील झाले - हा इयुचा सर्वात मोठा विस्तार होता (झेक रिपब्लिक, इस्टोनिया, सायप्रस, लॅटविया, लिथुआनिया, हंगेरी, माल्टा, पोलंड, स्लोव्हाकिया आणि स्लोव्हेनिया हे ते दहा देश होते.) २००७ मध्ये बल्गेरिया आणि रोमानिया सामील झाल्यामुळे एकूण सदस्य संख्या २७ झाली. शेवटी २०१३ मध्ये क्रोएशिया इयु मध्ये सामील झाला.

# मी आणि पटेल यांनीच टीकेचे धनी का व्हायचे?

पान १ वरून - आहे. तर तटकरे यांच्या भूमिकेनंतर एकाही आमदाराने प्रतिक्रिया दिली नाही.

या बैठकीत भुजबळ यांनी आगामी २०२९ विधानसभा निवडणुका पक्षाने स्वबळावर लढण्याची तयारी ठेवली पाहिजे, असा सल्ला दिला. काही विशिष्ट पक्षांना सातत्याने अपेक्षित मतदान मिळत असल्याने भविष्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे पक्षाने सावध राहण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. तर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी या बैठकीत अर्थखात्यावरून खंत व्यक्त केल्याची माहिती आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर ७ दिवसांत खाते राष्ट्रवादी अजित पवार गटाला देण्याचे आश्वासन राष्ट्रवादीला दिले होते. मात्र अर्थखात्याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांना सातत्याने विचारणा करूनही २ महिने होऊनही अद्याप निर्णय झालेला नाही.

# डिलिव्हरीनंतर ५ महिलांचा मृत्यू!
## रुग्णालयातील इंजेक्शन बनावट

कोटा- राजस्थानच्या कोटामधील न्यू मेडिकल कॉलेज रुग्णालयात प्रसूतीनंतर ५ महिलांचा मृत्यू झाल्याने आरोग्य विभागात एकच खळबळ उडाली आहे. राजस्थानच्या सरकारी रुग्णालयांमध्ये वापरण्यात येत असलेल्या औषधांच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. महिलांच्या प्रसूतीदरम्यान रक्तस्राव रोखण्यासाठी दिले जाणारे ऑक्सिटोसिन इंजेक्शनची एक खेप बनावट असल्याचे उघड झाले.

# मंत्रालयात मराठीचे धिंडवडे
# सूचनाफलकावर अशुद्ध भाषा

मुंबई

**राज्यात** परप्रांतीय रिक्षा, टॅक्सी आणि ॲप आधारित वाहनचालकांना मराठी लिहिता-वाचता यावी यासाठी मंत्रालयात बैठका घेतल्या जात असताना, त्याच मंत्रालयाच्या प्रवेशद्वारावर मराठी भाषेची मोठी चूक आढळून आली आहे. मंत्रालयाच्या 'गार्डन गेट'बाहेर लावण्यात आलेल्या सूचनाफलकावरील अशुद्ध मराठीमुळे प्रशासनावर टीका होत आहे. मंत्रालय प्रवेश करीता ०२.०० वाजल्यांचे रांग येथुन चालु असा मजकूर असलेला फलक मंत्रालयाच्या प्रवेशद्वारावर लावण्यात आला आहे.

# घुसखोरीचा माग काढण्यासाठी
# उच्चस्तरीय समितीची स्थापना

नवी दिल्ली

**देशाच्या** विविध भागांत घुसखोरी, स्थलांतर आणि अन्य कारणांमुळे लोकसंख्येच्या समीकरणात चिंताजनक बदल होत चालला आहे. त्यामुळे याचा बारकाईने अभ्यास करण्यासाठी केंद्र सरकारने आज उच्चस्तरीय समिती गठित केली. गृहमंत्री अमित शहा यांनी एक्स पोस्टवर ही माहिती दिली. लोकसंख्येच्या समीकरणात बदल होणे हे देशाच्या सार्वभौमत्वासाठी धोक्याचे आहे. राष्ट्रीय सुरक्षा, कायदा आणि सुव्यवस्था, सामाजिक संरचना आदिंसाठीदेखील ही बाब धोकादायक आहे. त्यामुळे या समस्येच्या मुळाशी जाऊन त्यावर आवश्यक उपाययोजना सुचवण्यासाठी उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. न्या. प्रकाश प्रभाकर नावलेकर (निवृत्त) हे या समितीचे अध्यक्ष असतील. तसेच जनगणना आयुक्तांसह निवृत्त आयएएस अधिकारी दुर्गाशंकर मिश्रा, निवृत्त आयपीएस अधिकारी बालाजी श्रीवास्तव आणि डॉ. शमिका रवी समितीचे सदस्य असतील.

# सावंतवाडीचे नाव बदलले
# आता मधू दंडवते स्थानक

पान १ वरून - डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील मौजे सागाव सोनारपाडा (ता. कल्याण, जि. ठाणे) येथील पिंपळेश्वर देवस्थान मंदिर ट्रस्टला ४ एकर २५ गुंठे जमीन मिळणार आहे. या जमिनीवरील मंदिर ट्रस्टचा वापर नियमित करण्यास व ही जमीन ट्रस्टला नाममात्र दरात देण्यास मान्यता देण्यात आली. नवीन नागपूर व नवीन बाह्य वळण रस्त्यासाठी खरेदी करायच्या जमिनीसाठीचे मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. मौजे गोदणी आणि मौजे लाडगाव (रीठी) (ता. हिंगणा, जि. नागपूर) येथील खासगी जमीन नवीन नागपूर व नवीन बाह्य वळण रस्ता प्रकल्पासाठी वाटाघाटीने थेट खरेदी करावी लागणार आहे. या व्यवहारावरील मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क माफ करण्यास मान्यता देण्यात आली.

**जाहीर सुचना**

सर्व संबंधीत व्यक्ती अधिकृत रहिवासी , पर्यावरण विषयक मंडळ एन. जी. ओ आणि इतर यांना या जाहीर सूचनेद्वारे असे कळविण्यात येते कि, राज्य पर्यावरण आघात मूल्यांकन प्राधिकरण महाराष्ट्र राज्य यांनी खालील वसाहत बांधकामासाठी पर्यावरण अनुमती प्रदान केली आहे. महाराष्ट्र सरकार पर्यावरण विभाग रूम नं. २१७ दुसरा मजला मंत्रालय विस्तारित, मुंबई ४०००३२ यांनी त्यांच्या **पत्र क्र. EC26C3801MH5427712N दिनांक. १९.०५.२०२६** याद्वारे **मेसर्स. नान एंटरप्राइझेस** यांच्या रहिवासी आणि वाणिज्य प्रकल्प सी.एस. नं. ६२६, ६२७, ६२८ व ६२९, माझगाव विभाग, संत सावता मार्ग, माझगाव, मुंबई, महाराष्ट्र येथील पर्यावरण विषयक परवानगी दिली आहे. सदर परवानगी पत्राच्या प्रति महाराष्ट्र शासन, पर्यावरण विभाग मंत्रालय व महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे उपलब्ध आहेत.

**संचालक**
**मेसर्स. नान एंटरप्राइझेस.**
७५/७७, फणसवाला बिल्डिंग, तळ मजला, बी-७, संकळी मार्ग, मुंबई- ४००००८.

# एलआयसीतील सरकारी हिस्सा कमी करणार




**मुंबई -** आगामी २०२७ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या दोन तिमाहींमध्ये सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमधील हिस्सेदारी टप्प्याटप्प्याने कमी करण्याची योजना केंद्र सरकारच्या विचाराधीन आहे. या उपक्रमांमध्ये भारतीय जीवन विमा निगम (एलआयसी), कोल इंडिया लिमिटेड (सीआयएल), इंडियन ओव्हरसीज बँक (आयओबी) आणि इंडियन रेल्वे फायनान्स कॉर्पोरेशन या उपक्रमांचा समावेश आहे. एलआयसीमधील हिस्सा विक्री दुसऱ्या तिमाहीत जुलै ते सप्टेंबर या दरम्यान ऑफर फॉर सेलच्या (ओएफएस) माध्यमातून करण्यात येणार आहे. या हिस्सा विक्रीतून २०२७ च्या आर्थिक वर्षात ८० हजार कोटी रुपयांचा महसूल उभा करण्यात येणार.

# विनाशकाले विपरीत बुद्धि...!




**संजय** गांधी नॅशनल पार्कमध्ये जागतिक दर्जाचे अटल बिहारी वाजपेयी विद्यापीठ उभारणे आणि संपूर्ण नॅशनल पार्क व आरे कॉलनी मिळून 'एकात्मिक शहर' विकसित करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारकडे सादर झाला आहे.

धक्कादायक बाब म्हणजे जानेवारी २०२५ पासून राज्य सरकारने या प्रस्तावावर मत विचारण्यासाठी मुख्य वनसंरक्षकांना दोन पत्रे आणि एक स्मरणपत्र पाठवले. म्हणजे ही कल्पना केवळ एखाद्या व्यक्तीची विक्षिप्त महत्त्वाकांक्षा राहिलेली नाही; ती सत्तेने मनावर घेतलेला आसुरी उपक्रम बनण्याच्या मार्गावर आहे.

हा प्रस्ताव बिहारमधील मिर्झापूर आणि मीरा रोड येथे कॅम्पस असलेल्या एका ट्रस्टच्या वतीने आर. डी. झा यांनी दिला. त्यांनी आधी नॅशनल पार्कचे नाव बदलून 'अटल बिहारी वाजपेयी नॅशनल पार्क' करण्याची मागणी केली आणि त्याच प्रस्तावात विद्यापीठ व 'इंटिग्रेटेड टाऊनशिप' उभारण्याचा आराखडाही हळूच जोडला.

**मुंबईच्या मध्यभागी उभे असलेले संजय गांधी राष्ट्रीय उद्यान हे केवळ जंगल नाही. ते या शहराचा उरलेला शेवटचा श्वास आहे. पण आता या जंगलालाच सिमेंटच्या बाजारात विकण्याची तयारी सुरू असल्याचे उघड झाले आहे.**

तब्बल पाच लाख लोकांसाठी अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य देणारे एकात्मिक शहर उभारण्याची भाषा या प्रस्तावात वापरली गेली आहे.

पण प्रश्न असा आहे की, मुंबईत घरांची समस्या सोडवण्यासाठी जंगलच का संपवायचे आहे?

बिल्डर लॉबीच्या आर्थिक फायद्यासाठी आणि सत्तेतील लोकांच्या राजकीय स्वार्थासाठी प्रत्येक हरीत जागा ताब्यात घेण्याची ही निर्ढावलेली नजर इतकी बिनधास्त झाली आहे की आता राष्ट्रीय उद्यानही त्यातून सुटलेले नाही!

मुख्य वनसंरक्षकांनी या प्रस्तावाला स्पष्ट विरोध केला आहे, ही या संपूर्ण प्रकरणातील एकमेव दिलासादायक बाब म्हणावी लागेल. त्यांच्या पत्रात स्पष्ट नमूद आहे की, विद्यापीठ उभारण्यासाठी लागणारे बांधकाम, रस्ते, वाहतूक, सार्वजनिक सेवा आणि मोठ्या प्रमाणावरील मानवी वर्दळ यामुळे वन्यजीवांचे अधिवास उद्ध्वस्त होतील आणि जमीनवापर बदलून जाईल. वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ आणि वनसंवर्धन कायद्याशी हे विसंगत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

जर सरकारला विद्यापीठ उभारायचेच असेल तर राष्ट्रीय उद्यानाबाहेर जागा शोधावी, असेही त्यांनी स्पष्ट सांगितले.

हे जंगल का महत्त्वाचे आहे, याची जाणीव कदाचित वातानुकूलित कार्यालयांत बसलेल्या धोरणकर्त्यांना नसावी.

१०३ चौ. कि.मी. क्षेत्रफळ असलेले हे उद्यान मुंबईचे पर्यावरणीय सुरक्षा कवच आहे. मुंबईत प्राणवायू सोडणारे फुफ्फुस आहे. तुळशी आणि विहार तलावांच्या जलस्त्रोतांचे संरक्षण करणारे हे जंगल हजारो वनस्पती, शेकडो पक्षी, बिबटे, साप, फुलपाखरे आणि असंख्य जैविक प्रजातींचे घर आहे. जगातील फार थोड्या महानगरांमध्ये शहराच्या मध्यभागी असे राष्ट्रीय उद्यान टिकून आहे.

पण मुंबईत मात्र प्रत्येक संकटातून धडा घेण्याऐवजी निसर्गावरच बुलडोझर चालवण्याची परंपरा सुरू आहे. मिठी नदी बुजवली, मॅंग्रोव्ह तोडले, किनाऱ्यांवर काँक्रीट ओतले त्यामुळे मग प्रत्येक पावसात शहर बुडतेच. आता जंगलावर डल्ला मारून भविष्यातील आपत्तींचे बीज पेरले जात आहे. हात दाखवून अवलक्षण.



या प्रस्तावात 'विकास' हा शब्द वापरून पर्यावरण विनाशाचे समर्थन केले जात आहे हे भयंकर आहे.

विकास म्हणजे शहराचा श्वास गुदमरवणे नसते. विकास म्हणजे लोकांना जिवंत ठेवणारी नैसर्गिक यंत्रणा नष्ट करणे नसते.

आज मुंबईत उष्णता वाढत आहे, हवा विषारी होत आहे, पूर वाढत आहेत आणि मोकळी जागा संपत चालली आहे.

अशावेळी राष्ट्रीय उद्यानात शहर उभारण्याची कल्पना मांडणारे लोक प्रत्यक्षात मुंबईच्या भविष्यासोबत जुगार खेळत आहेत.

हा केवळ पर्यावरणाचा मुद्दा नाही. हा लोकशाही आणि सार्वजनिक संसाधनांच्या मालकीचा प्रश्न आहे.

## व्हायरल पोस्ट

जंगल, नद्या, डोंगर आणि समुद्र हे कोणत्याही सरकारचे खासगी मालमत्तेचे तुकडे नाहीत. ते जनतेचे आहेत आणि पुढच्या पिढ्यांचे आहेत. म्हणूनच संजय गांधी नॅशनल पार्कमध्ये गृहनिर्माण किंवा विद्यापीठाच्या नावाखाली सिमेंटचे साम्राज्य उभारण्याचा कोणताही प्रयत्न हा केवळ चुकीचा निर्णय नाही, तर तो मुंबईकरांविरुद्धचा विश्वासघात आहे. आणि अशा विश्वासघाताला इतिहास कधीच माफ करत नाही.

# रस्त्यांवरील चर भरण्याचा खर्च ६१८ कोटींवर जाणार

**स्थायी समितीकडे मंजुरीसाठी प्रस्ताव**

■ मुंबई

**शहरात** महानगर गॅस आणि टेलिकॉम कंपन्यांकडून खोदण्यात येणारे रस्ते आणि चर भरण्यासाठी मुंबई महापालिकेने तब्बल ६१८ कोटी रुपयांच्या सुधारित खर्चाचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर मांडला आहे. मुंबईत वाढत्या पीएनजी आणि इतर पायाभूत सुविधांच्या जाळ्यामुळे रस्ते खोदण्याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. त्यामुळे हे चर बुजविण्याचा खर्च २०० कोटींवरून ६१८ कोटींवर पोहोचला.

वास्तविक रस्त्यांवर या कंपन्यांमार्फत रस्त्यांवर खोदल्या जाणाऱ्या चरी बुजविण्याचे काम संबंधित कंपन्यांचे असते, तरीही काही कंपन्या वेळेवर चर बुजवत नाहीत. तर आता अशा प्राधिकरणाकडून दुप्पट रक्कम वसूल केली जाईल, असा इशारा पालिका प्रशासनाने दिला आहे. दुसरीकडे अशी न बुजवलेली चर बुजवण्याचे काम पालिकेला कंत्राटदारांमार्फत करावे लागते. मात्र आता या कंत्राटी खर्चात दुपटीहून वाढ करण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. त्यासाठी पालिकेचा सात विभागांसाठी सविस्तर अंदाजित प्रकल्प खर्च पूर्वी मंजूर केलेल्या २४३.५२ कोटी रुपयांवरून ५८३.०२ कोटी रुपयांपर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव आहे. या अतिरिक्त ३३९.५ कोटी रुपयांच्या प्रस्तावित वाढीसह सुधारित अंदाजित खर्च ६१८ कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यास पालिकेने मंजुरी मागितली आहे.

# विकास लवांडेंना जामीन मंजूर

■ पुणे

**शरद** पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडे यांना न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. ३० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर त्यांची सुटका करण्याचे आदेश न्यायालयाने दिले. किर्तनकारांबाबत केलेल्या वक्तव्यावरून पुणे पोलिसांनी लवांडे यांना अटक केली होती. त्यानंतर पोलिसांकडून त्यांच्या कोठडीची मागणी करण्यात आली होती. मात्र, न्यायालयाने ही मागणी फेटाळून लावत त्यांना न्यायालयीन कोठडीत पाठवले होते. त्यामुळे जामिनासाठी अर्ज करण्याचा मार्ग मोकळा झाला होता. जामीन अर्जावर दोन्ही बाजूंकडून जोरदार युक्तिवाद झाला. सरकारी वकिलांनी जामिनाला विरोध दर्शवला. तरीही न्यायालयाने सर्व बाबींचा विचार करून लवांडे यांना जामीन मंजूर केला.

# शिंदे गटाच्या रविंद्र फाटकांशी चर्चा! हितेंद्र ठाकूर पिता-पुत्रांची भेट

■ मुंबई

**ठाणे-पालघर** जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीच्या आधी राजकीय घडामोडींना वेग आला आहे. शिंदे गटाचे माजी आमदार रवींद्र फाटक यांनी बहुजन विकास आघाडीचे सर्वेसर्वा हितेंद्र ठाकूर आणि नेते क्षितिज ठाकूर यांची भेट घेतली.

रवींद्र फाटक यांच्या जागी विधान परिषदेसाठी क्षितिज ठाकूर यांना उमेदवारी दिली जाऊ शकते, अशी चर्चा सध्या रंगली आहे. विरार येथील बहुजन विकास आघाडीच्या कार्यालयात झालेल्या या भेटीनंतर बहुजन विकास आघाडी आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जवळीक वाढत असल्याची चर्चा आहे.



विधान परिषद निवडणुकीत स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नगरसेवकांची मते निर्णायक ठरणार आहेत. वसई-विरार महापालिका आणि पालघर जिल्ह्यात बहुजन विकास आघाडीचे मोठे वर्चस्व असून, वसई-विरारमध्ये पक्षाचे तब्बल ७१ नगरसेवक आहेत. त्यामुळे बहुजन विकास आघाडीचा पाठिंबा मिळवण्यासाठी महायुतीकडून हालचाली सुरू असल्याचे बोलले जात आहे. महायुतीच्या उमेदवाराला भरघोस मते मिळावीत यासाठी रवींद्र फाटक विविध मित्रपक्ष आणि स्थानिक नेत्यांच्या भेटीगाठी घेत आहेत. त्याचाच भाग म्हणून त्यांनी हितेंद्र ठाकूर आणि क्षितिज ठाकूर यांची भेट घेतली. रवींद्र फाटक म्हणाले की, महापालिका निवडणुकीवेळी वसई-विरार आणि पालघरची जबाबदारी माझ्याकडे होती. मी पालघर जिल्ह्याचा संपर्कप्रमुख असल्याने जिल्ह्यातील अनेक नेत्यांच्या भेटीगाठी होत असतात. हितेंद्र ठाकूर यांनी सांगितले की, घोडा मैदान समोर आहे. आमची चर्चा सुरू आहे. मी आमदार होणार नाही. कोणताही बाप मुलाच्या पाठीशी उभा राहतो. निवडणुकीत पुढे काय होते ते पाहू.

# मोदींच्या आवाहनाला अहमदाबादमध्ये हरताळ

■ अहमदाबाद

**मोदींच्या** आवाहनाला अहमदाबादमध्ये हरताळ फासलेला दिसत आहे. इंधन संकटाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक वाहतुकीचा वापर करून इंधन बचत करण्याचे केंद्र सरकार आणि गुजरात सरकारचे वारंवार आवाहन अहमदाबादकरांवर परिणामकारक ठरलेले दिसत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानंतर दहा दिवस उलटूनही शहरातील एएमटीएस बस, बीआरटीएस किंवा मेट्रो रेल्वेच्या प्रवाशांच्या संख्येत कोणतीही लक्षणीय वाढ झालेली नाही.

इराण-अमेरिका संघर्षामुळे इंधन तुटवडा निर्माण झाला. त्यामुळे पेट्रोल आणि डिझेलचा वापर कमी करण्याचे आवाहन प्रशासनाकडून नागरिकांना करण्यात येत आहे. अधिकाधिक प्रवाशांनी सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा यासाठी अहमदाबाद मेट्रोने रात्री ११ वाजेपर्यंत सेवा वाढवली आहे.

# नीट प्रकरणी शिवराज मोटेगावकरच्या स्पेशल बॅचची सीबीआयकडून चौकशी

■ लातूर

**मुंबई -** नीट-यूजी २०२६ पेपरफुटी प्रकरणात आरोपी व 'रेणुकाई करिअर सेंटर'चा संचालक प्रा. शिवराज मोटेगावकरच्या कथित स्पेशल बॅचची आता केंद्रीय अन्वेषण विभागाकडून (सीबीआय) सखोल चौकशी सुरू करण्यात आली आहे. अकोला आणि लातूरमधील काही विद्यार्थ्यांची चौकशी पूर्ण झाली असून आता इतर विद्यार्थ्यांनाही चौकशीसाठी बोलावले जाणार आहे. तसेच नोट्स आणि प्रश्नपत्रिकांचीही तपासणी करण्यात येणार आहे. या प्रकरणी मोटेगावकरला एक दिवसाची सीबीआय कोठडी सुनावली आहे.

नीट पेपरफुटी प्रकरणाच्या तपासासाठी सीबीआयचे पथक सलग बाराव्या दिवशीही लातूरमध्ये तळ ठोकून आहे. विद्यार्थी, पालक आणि खासगी शिकवणी वर्ग यांच्यावर या तपासाचा मुख्य भर असून विविध ठिकाणी चौकशी सुरू आहे. सीबीआयने आरसीसी क्लासेसमध्ये जाऊन कागदपत्रांची पडताळणी केली असून काही विद्यार्थी आणि पालकांची चौकशीही केली आहे.याचबरोबर लातूरच्या शासकीय विश्रामगृहात एका डॉक्टरालाही चौकशीसाठी बोलावण्यात आले आहे. तपासादरम्यान मोटेगावकर क्लासेस, खासगी वसतिगृहे आणि इतर संबंधित ठिकाणांचीही तपासणी करण्यात आली.

# एसआयआर गांभीर्याने घ्या! आदित्य ठाकरे यांचा इशारा

■ मुंबई

**निवडणूक** आयोगाकडून सुरू असलेल्या मतदार यादी पडताळणी (एसआयआर) प्रक्रियेबाबत कोणीही गाफील राहू नका, अन्यथा महाराष्ट्रातही पश्चिम बंगाल किंवा बिहार परिस्थिती निर्माण होऊ शकते, असा इशारा उबाठाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी दिला आहे.

दादर येथील शिवसेना भवनात झालेल्या बैठकीत आदित्य ठाकरे यांनी मुंबईतील नगरसेवक, माजी नगरसेवक, विभागप्रमुख आणि शाखाप्रमुखांना संबोधित करताना एसआयआर प्रक्रियेचे गांभीर्य लक्षात घेण्याचे आवाहन केले. निवडणूक आयोग सध्या मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी विशेष मोहीम राबवत आहे. मात्र, पश्चिम बंगाल आणि बिहारमध्ये या प्रक्रियेदरम्यान हजारो मतदारांची नावे वगळण्यात आल्याचे आरोप होत असल्याच्या पार्श्वभूमीवर ठाकरे यांनी ही भूमिका मांडली. आदित्य ठाकरे म्हणाले की, बिहार आणि पश्चिम बंगालमध्ये एसआयआर प्रक्रियेसाठी कमी वेळ देण्यात आला होता. मात्र, महाराष्ट्रात पुरेसा वेळ उपलब्ध असल्याने प्रत्येक पदाधिकाऱ्याने या कामात सक्रिय सहभाग घ्यावा. निवडणुकांना अजून सुमारे तीन वर्षे असली, तरी स्थानिक पातळीवर सुरू होणाऱ्या प्रक्रियेकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.

# प्रताप सरनाईकांची मर्सिडीज श्रीमंतांची जोरदार इंधन बचत



सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ मुंबई

**परिवहन** मंत्री प्रताप सरनाईक यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचतीच्या आवाहनाचे कारण देत स्वतःची जुनी पेट्रोल गाडी विकून नवीन मर्सिडिज बेंझची कोट्यवधीची ईव्ही गाडी विकत घेतली. ही नवी कोरी गाडी घेऊन प्रताप सरनाईक सिद्धिविनायकाच्या दर्शनाला पोहोचले.

# बंडू आंदेकरच्या भेटींवर बंदी! व्हिडिओद्वारेच न्यायालयात हजेरी

■ पुणे

**माजी** नगरसेवक वनराज आंदेकर हत्या प्रकरणानंतर सुरू असलेल्या गुन्हेगारी हालचालींवर लगाम घालण्यासाठी पोलिसांनी कडक पावले उचलली आहेत. टोळीचा म्होरक्या बंडू आंदेकर याच्या नातेवाईक व साथीदारांशी होणाऱ्या भेटीगाठींवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील काळात त्याला न्यायालयात प्रत्यक्ष न आणता 'व्हिडिओ कॉन्फरन्सिंग'द्वारे हजर केले जाणार आहे.

आंदेकर कारागृहात असतानाही साथीदारांना हत्या व हत्येच्या प्रयत्नांसारखे गंभीर गुन्हे करण्यासाठी चिथावणी देत होता. या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी राज्य कारागृह प्रशासनाशी पत्रव्यवहार करत कडक निर्बंधांची मागणी केली आहे. या निर्णयानुसार आंदेकरला कारागृहात स्वतंत्र ठेवणे, नातेवाईकांच्या भेटींवर निर्बंध आणणे, दूरध्वनी सुविधेचा वापर बंद करणे, तसेच न्यायालयीन सुनावणीसाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगचा वापर करणे यासारख्या उपाययोजना राबवण्यात येणार आहेत. पोलिसांनी कारागृह प्रशासनाशी समन्वय साधून ही प्रक्रिया सुरू केली आहे.



वनराज आंदेकरची हत्या झाल्यानंतर सूड उगविण्यासाठी बंडू आंदेकर टोळीने आयुष कोमकरची नाना पेठेत गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पूर्वसंध्येला हत्या केली. त्यानंतर कोंढव्यातील खडी मशीन चौकात आंदेकर खून प्रकरणातील आरोपींना पिस्तूल पुरविणारा आरोपीचा भाऊ गणेश काळे याची गोळीबार करून हत्या करण्यात आली. आठवड्यापूर्वी आंदेकर टोळीतील सराईतांनी पुणे-सातारा रस्त्यावरील बालाजीनगर परिसरात अक्षय म्हस्केवर गोळीबार केला. या घटनेत म्हस्के बचावला होता. सध्या बंडू आंदेकर धुळे जिल्हा कारागृहात बंदिस्त आहे तर त्याचा मुलगा कृष्णा आंदेकर नंदुरबार कारागृहात आहे.

# पोक्सोच्या गंभीर गुन्ह्यातील आरोपीची निर्दोष मुक्तता

■ मुंबई

**पोक्सोच्या** गंभीर गुन्ह्यातील पीडित मुलीने आरोपीशी लग्न केल्याने खटल्याला नाट्यमय वळण लागले आणि विशेष पोक्सो न्यायालयाने आरोपीची निर्दोष मुक्तता केली. भांडूपमध्ये घडलेल्या कथित अत्याचाराच्या घटनेतील पीडित मुलीसह तिची आई फितूर बनल्याने विशेष न्यायालयाच्या न्यायाधीश सुरेखा सिंह यांनी हा निकाल दिला.

फेब्रुवारी २०२१ मध्ये भांडुप (पश्चिम) परिसरात राहणाऱ्या ४५ वर्षीय महिलेने (पीडितेची आई) पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्या तक्रारीनुसार १५ वर्षांची मुलगी आणि आरोपी यांच्यात मैत्री होती. २७ फेब्रुवारी २०२१ रोजी सार्वजनिक शौचालयातून दोघे एकत्र बाहेर पडताना दिसले. आईने विचारपूस केली असता, आरोपीने लग्नाचे आमिष दाखवून नोव्हेंबर २०१९ ते मार्च २०२० दरम्यान वारंवार अत्याचार केल्याचे मुलीने सांगितले होते. या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध पोक्सो कायद्याच्या विविध कलमांखाली गुन्हा नोंदवला होता.

# मोदींनी देशाच्या शिक्षण व्यवस्थेला सुरुंग लावला! वडेट्टीवारांचा घणाघात

■ मुंबई

**देशात** २०१४-१५ ते २०२४-२५ या दशकभरात सुमारे १ लाख शाळा बंद झाल्याचे नीती आयोगाच्या अहवालातून उघड झाले आहे. यात ९४ हजार सरकारी आणि सुमारे ४ हजार अनुदानित शाळांचा समावेश आहे. त्याच कालावधीत तब्बल ५१ हजार खासगी शाळा सुरू झाल्या आहेत. केंद्र सरकारच्या नीती आयोगाच्या शालेय शिक्षणावरील अहवालातून ही आकडेवारी उघड झाली आहे. यावरून काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शैक्षणिक धोरणावर सडकून टीका केली. मोदींनी देशाच्या शिक्षण व्यवस्थेला सुरुंग लावला, अशी घणाघाती टीका वडेट्टीवार यांनी केली.

वडेट्टीवार म्हणाले की, सत्ताधारी भाजपाचे सगळेच नेते मोदींच्या सत्तेची तपपूर्ती साजरी करण्यात व्यस्त आहेत. पण या एका तपात मोदी सरकारने देशाच्या शिक्षण व्यवस्थेला जो सुरुंग लावला, त्याबद्दल कोणी अवाक्षरही बोलत नाही. मोदी सरकारच्या कार्यकाळात देशाची शिक्षण व्यवस्था कशी उद्ध्वस्त झाली हे केंद्राच्याच नीती आयोगाच्या शालेय शिक्षण अहवालाने उघड केले आहे. २०१४ ते २०२५ या काळात देशभरात जवळपास १,००,००० सरकारी शाळा बंद झाल्या, पण याच काळात जवळपास ५१,००० नवीन खासगी शाळा सुरू झाल्या.

# मुंबईतील जिमखान्यांचे सर्वेक्षण ताब्यात घेण्याची हालचाल सुरू



**केंद्र सरकारने दिल्ली जिमखान्याला त्यांची जागा सरकारला हस्तांतरित करण्याचे निर्देश दिल्यानंतर महाराष्ट्र सरकारने मुंबईतील सरकारी जमिनीवर असलेल्या जिमखान्यांची तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. जिमखाने ताब्यात घेण्याची ही हालचाल सुरू झाली आहे.**

■ मुंबई

**मुंबईतील** हिंदू जिमखाना, कॅथलिक जिमखाना, पारशी जिमखाना, पारशी वाडिया जिमखाना, पीव्हीएम जिमखाना आणि इस्लाम जिमखाना यांचा तपास होणार आहे. बॉम्बे जिमखान्याची १८७५ मध्ये स्थापना झाली. हा जिमखाना शहरातील प्रतिष्ठित क्लबपैकी एक मानला जातो. क्लबला ९९ वर्षांच्या भाडेपट्ट्यावर जमीन देण्यात आली. २००६ मध्ये ही मुदत संपली. तर क्लबच्या मैदानाचा भाडेपट्टा २००७ मध्ये संपुष्टात आला. आता याची चौकशी होणार आहे.

केंद्र सरकारने दिल्ली जिमखान्याला ५ जूनपर्यंत जागा हस्तांतरित करण्यास सांगितल्याच्या पार्श्वभूमीवर आता महाराष्ट्रातही सर्व जिमखान्यांची तपासणी करण्याचा निर्णय घेतला जात आहे.